| | | सुनावणीचा दि. 15.07.2025 | | वेळ सकाळी 10.30 वा. | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | अपील क्र. | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी | शेरा |
| 1 | 283/2024 | श्री. प्रकाश गणपती सोनार, रा. जवळे (दु), पो. खामगांव ता. जि. धाराशिव | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय जवळे (दु), ता. जि. धाराशिव | विस्तार अधिकारी, पंचायत समिती धाराशिव | |
| 2 | 348/2024 | श्री. प्रकाश गणपती सोनार, रा. जवळे (दु), पो. खामगांव ता. जि. धाराशिव | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय जवळे (दु), ता. जि. धाराशिव | विस्तार अधिकारी, पंचायत समिती धाराशिव | |
| 3 | 349/2024 | श्री. प्रकाश गणपती सोनार, रा. जवळे (दु), पो. खामगांव ता. जि. धाराशिव | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय जवळे (दु), ता. जि. धाराशिव | विस्तार अधिकारी, पंचायत समिती धाराशिव | |
| 4 | 350/2024 | श्री. प्रकाश गणपती सोनार, रा. जवळे (दु), पो. खामगांव ता. जि. धाराशिव | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय जवळे (दु), ता. जि. धाराशिव | विस्तार अधिकारी, पंचायत समिती धाराशिव | |
| 5 | 600/2024 | श्री. प्रकाश गणपती सोनार, रा. जवळे (दु), पो. खामगांव ता. जि. धाराशिव | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय जवळे (दु), ता. जि. धाराशिव | विस्तार अधिकारी, पंचायत समिती धाराशिव | |
| 6 | 601/2024 | श्री. प्रकाश गणपती सोनार, रा. जवळे (दु), पो. खामगांव ता. जि. धाराशिव | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय जवळे (दु), ता. जि. धाराशिव | विस्तार अधिकारी, पंचायत समिती धाराशिव | |
| 7 | 602/2024 | श्री. प्रकाश गणपती सोनार, रा. जवळे (दु), पो. खामगांव ता. जि. धाराशिव | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय जवळे (दु), ता. जि. धाराशिव | विस्तार अधिकारी, पंचायत समिती धाराशिव | |
| 8 | 603/2024 | श्री. प्रकाश गणपती सोनार, रा. जवळे (दु), पो. खामगांव ता. जि. धाराशिव | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय जवळे (दु), ता. जि. धाराशिव | विस्तार अधिकारी, पंचायत समिती धाराशिव | |
| 9 | 604/2024 | श्री. प्रकाश गणपती सोनार, रा. जवळे (दु), पो. खामगांव ता. जि. धाराशिव | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय जवळे (दु), ता. जि. धाराशिव | विस्तार अधिकारी, पंचायत समिती धाराशिव | |
| 10 | 605/2024 | श्री. प्रकाश गणपती सोनार, रा. जवळे (दु), पो. खामगांव ता. जि. धाराशिव | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय जवळे (दु), ता. जि. धाराशिव | विस्तार अधिकारी, पंचायत समिती धाराशिव | |
| | | सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी | | लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी | |

| | | सुनावणीचा दि. 15.07.2025 | | वेळ सकाळी 10.30 वा. | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | अपील क्र. | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी | शेरा |
| 11 | 606/2024 | श्री. प्रकाश गणपती सोनार, रा. जवळे (दु), पो. खामगांव ता. जि. धाराशिव | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय जवळे (दु), ता. जि. धाराशिव | विस्तार अधिकारी, पंचायत समिती धाराशिव | |
| 12 | 996/2024 | श्री. प्रकाश गणपती सोनार, रा. जवळे (दु), पो, खामगांव ता. जि. धाराशिव | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय जवळे (दु), ता. जि. धाराशिव | विस्तार अधिकारी, पंचयत समिती धाराशिव | |
| 13 | 2199/2024 | श्री. प्रकाश गणपती सोनार, रा. जवळे (दु), पो. खामगांव ता. जि. धाराशिव | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय जवळे (दु), ता. जि. धाराशिव | विस्तार अधिकारी, पंचायत समिती धाराशिव | |
| 14 | 4515/2024 | श्री. प्रकाश गणपती सोनार, रा. जवळे (दु), पो. खामगांव ता.जि. धाराशिव | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, जवळे दु ता. जि. धाराशिव | विस्तार अधिकारी, पंचायत समिती धाराशिव | |
| 15 | 5331/2024 | श्री. प्रकाश गणपती सोनार, रा. जवळे दु पो. खामगांव ता. जि. धाराशिव | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय जवळे दु ता. जि. धाराशिव | विस्तार अधिकारी, पंचायत समिती धाराशिव | |
| 16 | 5341/2024 | श्री. प्रकाश गणपती सोनार, रा. जवळे दु पो. खामगांव ता. जि. धाराशिव | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय जवळे दु ता. जि. धाराशिव | विस्तार अधिकारी, पंचायत समिती धाराशिव | |
| 17 | 8056/2024 | श्री. प्रकाश गणपती सोनार, रा. जवळे (दु), ता. जि. धाराशिव | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय जवळे (दु) ता.जि. धाराशिव | विस्तार अधिकारी, पंचायत समिती धाराशिव | |
| 18 | 8057/2024 | श्री. प्रकाश गणपती सोनार, रा. जवळे (दु), ता. जि. धाराशिव | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय जवळे (दु) ता.जि. धाराशिव | विस्तार अधिकारी, पंचायत समिती धाराशिव | |
| 19 | 8327/2024 | श्री. प्रकाश गणपती सोनार, रा. जवळे दु पो.खामगांव ता. जि. धाराशिव | ग्रामसेवक, ग्रामपंचायात कार्यालय जवळे दु ता. जि.धाराशिव | विस्तार अधिकारी, पंचायत समिती धाराशिव | |
| 20 | 8328/2024 | श्री. प्रकाश गणपती सोनार, रा. जवळे दु पो.खामगांव ता. जि. धाराशिव | ग्रामसेवक, ग्रामपंचायात कार्यालय जवळे दु ता. जि.धाराशिव | विस्तार अधिकारी, पंचायत समिती धाराशिव | |
| | | सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी | | लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी | |

| | | सुनावणीचा दि. 15.07.2025 | | वेळ सकाळी 10.30 वा. | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | अपील क्र. | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी | शेरा |
| 21 | 1562/2024 | श्री. प्राकाश गणपती सोनार, रा. जवळे (दु), पो. खामगांव ता. जि. धाराशिव | सहाय्यक प्रशासन अधिकारी, पंचायत समिती धाराशिव | गट विकास अधिकारी, पंचायत समिती धाराशिव | |
| 22 | 2545/2024 | श्री. बाबुराव जोतिबा चव्हाण, रा. बामणी ता. जि. धाराशिव | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय बामणी ता. जि. धाराशिव | विस्तार अधिकारी, पंचायत समिती धाराशिव | |
| 23 | 2546/2024 | श्री. बाबुराव जोतिबा चव्हाण, रा. बामणी ता. जि. धाराशिव | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय बामणी ता. जि. धाराशिव | विस्तार अधिकारी, पंचायत समिती धाराशिव | |
| 24 | 2547/2024 | श्री. बाबुराव जोतिबा चव्हाण, रा. बामणी ता. जि. धाराशिव | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय बामणी ता. जि. धाराशिव | विस्तार अधिकारी, पंचायत समिती धाराशिव | |
| 25 | 2548/2024 | श्री. बाबुराव जोतिबा चव्हाण, रा. बामणी ता. जि. धाराशिव | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय बामणी ता. जि. धाराशिव | विस्तार अधिकारी, पंचायत समिती धाराशिव | |
| 26 | 8112/2024 | श्री. बाबुराव जोतिबा चव्हाण, रा. बामणी ता. जि. धाराशिव | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय बामणी ता. जि. उस्माणाबाद | विस्तार अधिकारी, पंचायत समिती धाराशिव | |
| 27 | 8113/2024 | श्री. बाबुराव जोतिबा चव्हाण, रा. बामणी ता. जि. धाराशिव | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय बामणी ता. जि. उस्माणाबाद | विस्तार अधिकारी, पंचायत समिती धाराशिव | |
| 28 | 8114/2024 | श्री. बाबुराव जोतिबा चव्हाण, रा. बामणी ता. जि. धाराशिव | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय बामणी ता. जि. उस्माणाबाद | विस्तार अधिकारी, पंचायत समिती धाराशिव | |
| 29 | 8115/2024 | श्री. बाबुराव जोतिबा चव्हाण, रा. बामणी ता. जि. धाराशिव | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय बामणी ता. जि. उस्माणाबाद | विस्तार अधिकारी, पंचायत समिती धाराशिव | |
| 30 | 8116/2024 | श्री. बाबुराव जोतिबा चव्हाण, रा. बामणी ता. जि. धाराशिव | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय बामणी ता. जि. उस्माणाबाद | विस्तार अधिकारी, पंचायत समिती धाराशिव | |
| | | सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी | | लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी | |

| | | सुनावणीचा दि. 15.07.2025 | | वेळ सकाळी 10.30 वा. | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | अपील क्र. | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी | शेरा |
| 31 | 8117/ 2024 | श्री. बाबुराव जोतिबा चव्हाण, रा. बामणी ता. जि. धाराशिव | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय बामणी ता. जि. उस्माणाबाद | विस्तार अधिकारी, पंचायत समिती धाराशिव | |
| 32 | 8118/ 2024 | श्री. बाबुराव जोतिबा चव्हाण, रा. बामणी ता. जि. धाराशिव | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय बामणी ता. जि. उस्माणाबाद | विस्तार अधिकारी, पंचायत समिती धाराशिव | |
| 33 | 8119/ 2024 | श्री. बाबुराव जोतिबा चव्हाण, रा. बामणी ता. जि. धाराशिव | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय बामणी ता. जि. उस्माणाबाद | विस्तार अधिकारी, पंचायत समिती धाराशिव | |
| 34 | 8120/ 2024 | श्री. बाबुराव जोतिबा चव्हाण, रा. बामणी ता. जि. धाराशिव | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय बामणी ता. जि. उस्माणाबाद | विस्तार अधिकारी, पंचायत समिती धाराशिव | |
| 35 | 8121/ 2024 | श्री. बाबुराव जोतिबा चव्हाण, रा. बामणी ता. जि. धाराशिव | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय बामणी ता. जि. उस्माणाबाद | विस्तार अधिकारी, पंचायत समिती धाराशिव | |
| 36 | 8122/ 2024 | श्री. बाबुराव जोतिबा चव्हाण, रा. बामणी ता. जि. धाराशिव | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय बामणी ता. जि. उस्माणाबाद | विस्तार अधिकारी, पंचायत समिती धाराशिव | |
| 37 | 8123/ 2024 | श्री. बाबुराव जोतिबा चव्हाण, रा. बामणी ता. जि. धाराशिव | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय बामणी ता. जि. उस्माणाबाद | विस्तार अधिकारी, पंचायत समिती धाराशिव | |
| 38 | 8124/ 2024 | श्री. बाबुराव जोतिबा चव्हाण, रा. बामणी ता. जि. धाराशिव | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय बामणी ता. जि. उस्माणाबाद | विस्तार अधिकारी, पंचायत समिती धाराशिव | |
| 39 | 8125/ 2024 | श्री. बाबुराव जोतिबा चव्हाण, रा. बामणी ता. जि. धाराशिव | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय बामणी ता. जि. उस्माणाबाद | विस्तार अधिकारी, पंचायत समिती धाराशिव | |
| 40 | 8126/ 2024 | श्री. बाबुराव जोतिबा चव्हाण, रा. बामणी ता. जि. धाराशिव | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय बामणी ता. जि. उस्माणाबाद | विस्तार अधिकारी, पंचायत समिती धाराशिव | |
| | | सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी | | लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी | |

| | | सुनावणीचा दि. 15.07.2025 | | वेळ सकाळी 10.30 वा. | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | अपील क्र. | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी | शेरा |
| 41 | 8127/2024 | श्री. बाबुराव जोतिबा चव्हाण, रा. बामणी ता. जि. धाराशिव | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय बामणी ता. जि. उस्माणाबाद | विस्तार अधिकारी, पंचायत समिती धाराशिव | |
| 42 | 8128/2024 | श्री. बाबुराव जोतिबा चव्हाण, रा. बामणी ता. जि. धाराशिव | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय बामणी ता. जि. उस्माणाबाद | विस्तार अधिकारी, पंचायत समिती धाराशिव | |
| 43 | 8743/2024 | श्री. वाघमारे लखन ज्ञानदेव,रा. जवळे (दु), ता. जि. धाराशिव | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय जवळे (दु), ता.जि. धाराशिव | विस्तार अधिकारी, पंचायत समिती धाराशिव | |
| 44 | 9573/2024 | श्री. सुधाकर मधुकर रणदिवे, रा. जवळे दु ता. जि. धाराशिव | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय जवळे दु ता. जि.धाराशिव | विस्तार अधिकारी, पंचायत समिती धाराशिव | |
| 45 | 9574/2024 | श्री. सुधाकर मधुकर रणदिवे, रा. जवळे दु ता. जि. धाराशिव | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय जवळे दु ता. जि.धाराशिव | विस्तार अधिकारी, पंचायत समिती धाराशिव | |
| 46 | 730/2024 | श्री. तांबोळी मकबुल आल्लाउदिन, रा. एस.टी. कॉलनी तुळजापुर ता. तुळजापुर जि. धाराशिव | सहाय्यक प्रशासन अधिकारी, पंचायत समिती धाराशिव | गट विकास अधिकारी, पंचायत समिती धाराशिव | |
| 47 | 2468/2024 | श्री. रावण खंडु खैरे, जुनोनी, ता. जि. धाराशिव | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय जुनोनी ता. जि. धाराशिव | विस्तार अधिकारी, पंचायत समिती धाराशिव | |
| 48 | 4053/2024 | श्री. रावण खंडु खैरे, रा. जुनोनी ता. जि. धाराशिव | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय जुनोनी ता. जि. धाराशिव | विस्तार अधिकारी, पंचायत समिती धाराशिव | |
| 49 | 4452/2024 | श्री. लक्ष्मण सोपान घोगरे, मु.पो. उपळे (मा), ता. जि. धाराशिव | ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत कार्यालय उपळे (मा), ता. जि. धाराशिव | विस्तार अधिकारी, पंचायत समिती धाराशिव | |
| 50 | 4454/2024 | श्री. बालाजी युल्लुप्पा पारसे, रा. कामेगांव ता. जि. धाराशिव | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, कामेगाव ता. जि. धाराशिव | विस्तार अधिकारी, पंचायत समिती धाराशिव | |
| | | सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी | | लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी | |

| | | सुनावणीचा दि. 15.07.2025 | | वेळ सकाळी 10.30 वा. | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | अपील क्र. | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी | शेरा |
| 51 | 4455/2024 | श्री. बालाजी युल्लुप्पा पारसे, रा. कामेगांव ता. जि. धाराशिव | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, कामेगाव ता. जि. धाराशिव | विस्तार अधिकारी, पंचायत समिती धाराशिव | |
| 52 | 7913/2024 | श्री. कोंडीबा तुळशीराम राऊत, रा. ताकविकी ता. जि. धाराशिव | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय ताकविकी ता.जि. धाराशिव | विस्तार अधिकारी, पंचायत समिती धाराशिव | |
| 53 | 10775/2024 | श्री. चंद्रकांत रंगनाथ गरड, रा. औरंगावाद सोलापुर रोड, गणपती मंदिर येडशी ता. जि. धाराशिव | ग्रामसेवक, ग्रामपंचयत कार्यालय, येडशी ता. जि. धाराशिव | विस्तार अधिकारी, पंचायत समिती धाराशिव | |
| 54 | 2750/2023 | श्री. लक्ष्मण अमृतराव हिरे, रा. महात्मा फुले नगर भोकर ता. भोकर जि. नांदेड | कार्यालय अधिक्षक, नगर परिषद भोकर जि. नांदेड | मुख्याधिकारी, नगर परिषद भोकर जि. नांदेड | |
| 55 | 2751/2023 | श्री. लक्ष्मण अमृतराव हिरे, रा. महात्मा फुले नगर भोकर ता. भोकर जि. नांदेड | कार्यालय अधिक्षक, नगर परिषद भोकर जि. नांदेड | मुख्याधिकारी, नगर परिषद भोकर जि. नांदेड | |
| 56 | 4491/2023 | श्री. गुलाम अली शाह सय्यद, हनुमान चौक, मुर्तुजा वली दरगाह, देगलुर ता. देगलुर जि. नांदेड | ज.मा.अ. नगर परिषद कार्यालय देगलुर जि. नांदेड | मुख्याधिकारी, नगर परिषद देगलुर जि.नांदेड | |
| 57 | 4492/2023 | श्री. गुलाम अली शाह सय्यद, हनुमान चौक, मुर्तुजा वली दरगाह, देगलुर ता. देगलुर जि. नांदेड | ज.मा.अ. नगर परिषद कार्यालय देगलुर जि. नांदेड | मुख्याधिकारी, नगर परिषद देगलुर जि.नांदेड | |
| 58 | 6135/2023 | श्री. सुरेश कालींगम देगलुरकर, रा. 38A/ 703, Ovchirs, Leverage Green, Koradi Road Nagpur | ज.मा.अ. नगर परिषद कार्यालय देगलुर जि. नांदेड | मुख्याधिकारी, नगर परिषद देगलुर जि. नांदेड | |
| 59 | 2356/2023 | श्री. योगेश गणपतराव जाकरे, रा. देशपांडे गल्ली, जामा मस्जिद जवळ, देगलुर ता. देगलुर जि. नांदेड | ज.मा.अ. नगर परिषद कार्यालय देगलुर जि. नांदेड | मुख्याधिकारी, नगर परिषद देगलुर जि. नांदेड | |
| 60 | 6945/2023 | श्री. पंजाबराव गणेशराव तालंगकर, मु.पो. माळोदे गल्ली हदगांव ता. हदगांव जि. नांदेड | बांधकाम विभाग नगर परिषद हदगांव जि. नांदेड | मुख्याधिकारी, नगर परिषद हदगांव जि. नांदेड | |
| | | सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी | | लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी | |

| | | सुनावणीचा दि. 15.07.2025 | | वेळ दुपारी 02.30 वा. | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | अपील क्र. | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी | शेरा |
| 61 | 6965/2023 | श्री. पंजाबराव गणेशराव तालंगकर, मु.पो. माळोदे गल्ली हदगांव ता. हदगांव जि. नांदेड | घनकचारा विभाग नगर परिषद हदगांव जि. नांदेड | मुख्याधिकारी, नगर परिषद हदगांव जि. नांदेड | |
| 62 | 920/2023 | श्री. महेश पांडुरंग मोरे, मु.पो. साठेनगर कंधार ता. कंधार जि. नांदेड | ज.मा.अ. नगर परिषद कार्यालय कंधार जि. नांदेड | मुख्याधिकारी, नगर परिषद कंधार जि. नांदेड | |
| 63 | 3972/2023 | श्री. अनिल गोपीनाथराव ढवळे, रा. 20-58, सुमेधनगर कंधार ता. कंधार जि. नांदेड | ज.मा.अ नगर परिषद कार्यालय कंधार जि. नांदेड | मुख्याधिकारी, नगर परिषद कंधार जि. नांदेड | |
| 64 | 3466/2023 | श्री. विजय पि. दिगंबर घोगरकर, रा. शिरुर कासार ता. शिरुर कासार जि. बीड | ज.मा.अ. नगरपंचायत कार्यालय हिमायतनगर जि.नांदेड | मुख्याधिकारी, नगरपंचायत कार्यालय हिमायतनगर जि.नांदेड | |
| 65 | 2158/2023 | श्री. शेख मगदुम शेख पशा, रा. फकिरपुरा कंधार ता. कंधार जि. नांदेड | ज.मा.अ. नगर परिषद कार्यालय लोहा जि. नांदेड | मुख्याधिकारी, नगर परिषद लोहा जि. नांदेड | |
| 66 | 3960/2023 | श्री. मारोती व्यंकटी शेळके, मु.पो. इंदिरानगर लोहा ता. लोहा जि. नांदेड | ज.मा.अ. नगर परिषद कार्यालय लोहा जि. नांदेड | मुख्याधिकारी, नगर परिषद लोहा जि. नांदेड | |
| 67 | 3961/2023 | श्री. मारोती व्यंकटी शेळके, मु.पो. इंदिरानगर लोहा ता. लोहा जि. नांदेड | ज.मा.अ. नगर परिषद कार्यालय लोहा जि. नांदेड | मुख्याधिकारी, नगर परिषद लोहा जि. नांदेड | |
| 68 | 6568/2023 | श्री. गणेश पोशट्टी ठक्कुरवार, मु.पो. कुंडलवाडी (फुलारी बेस), ता. बिलोली जि. नांदेड | ज.मा.अ. नगर परिषद कार्यालय कुडलवाडी ता. बिलोली जि. नांदेड | मुख्याधिकारी, नगर परिषद कुडलवाडी ता. बिलोली जि. नांदेड | |
| 69 | 828/2023 | श्री. गणेश आनंत काचावार, रा. पोलीस स्टेशन समोर मठगल्ली मुदखेड ता. मुदखेड जि. नांदेड | ज.मा.अ. नगर परिषद कार्यालय मुदखेड जि. नांदेड | मूख्याधिकारी, नगर परिषद मुदखेड जि. नांदेड | |
| 70 | 829/2023 | श्री. गणेश आनंत काचावार, रा. पोलीस स्टेशन समोर मठगल्ली मुदखेड ता. मुदखेड जि. नांदेड | ज.मा.अ. नगर परिषद कार्यालय मुदखेड जि. नांदेड | मूख्याधिकारी, नगर परिषद मुदखेड जि. नांदेड | |
| | | सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी | | लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी | |

| | | सुनावणीचा दि. 15.07.2025 | | वेळ दुपारी 02.30 वा. | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | अपील क्र. | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी | शेरा |
| 71 | 1086/ 2023 | श्री. गणेश आनंत काचावार, रा. पोलीस स्टेशन समोर मठगल्ली मुदखेड ता. मुदखेड जि. नांदेड | ज.मा.अ. नगर परिषद कार्यालय मुदखेड जि. नांदेड | मुख्याधिकारी, नगर परिषद मुदखेड जि. नांदेड | |
| 72 | 1087/ 2023 | श्री. गणेश आनंत काचावार, रा. पोलीस स्टेशन समोर मठगल्ली मुदखेड ता. मुदखेड जि. नांदेड | ज.मा.अ. नगर परिषद कार्यालय मुदखेड जि. नांदेड | मुख्याधिकारी, नगर परिषद मुदखेड जि. नांदेड | |
| 73 | 1115/ 2023 | श्री. शंकरलाल बालाप्रसाद लहा, रा. साईबाबा मंदिरा जवळ भोकर रोड, मुदेखड ता. मुदखेड जि. नांदेड | ज.मा.अ. नगर परिषद कार्यालय मुदखेड जि. नांदेड | मुख्याधिकारी, नगर परिषद मुदखेड जि. नांदेड | |
| 74 | 2467/ 2023 | श्री. शंकरलाल बालाप्रसाद लढा, रा. साईबाबा मंदिरजवळ, भोकर रोड मुदेखड ता. मुदखेड जि. नांदेड-431806 | नगर परिषद कार्यालय मुदखेड जि. नांदेड | मुख्याधिकारी, नगर परिषद मुदखेड जि. नांदेड | |
| 75 | 2469/ 2023 | श्री. शंकरलाल बालाप्रसाद लढा, रा. साईबाबा मंदिरजवळ, भोकर रोड मुदेखड ता. मुदखेड जि. नांदेड-431807 | नगर परिषद कार्यालय मुदखेड जि. नांदेड | मुख्याधिकारी, नगर परिषद मुदखेड जि. नांदेड | |
| 76 | 2846/ 2023 | श्री. शंकरलाल बालाप्रसाद लहा, रा. साईबाबा मंदिराजवळ भोकर रोड, मुदखेड जि.नांदेड | ज.मा.अ. नगर परिषद कार्यालय मुदखेड जि. नांदेड | मुख्याधिकारी, नगर परिषद मुदखेड जि. नांदेड | |
| 77 | 2468/ 2023 | श्री. शंकरलाल बालाप्रसाद लहा, रा. साईबाबा मंदिराजवळ भोकर रोड, मुदखेड जि.नांदेड | ज.मा.अ. नगर परिषद कार्यालय मुदखेड जि. नांदेड | मुख्याधिकारी, नगर परिषद मुदखेड जि. नांदेड | |
| 78 | 3499/ 2023 | श्री. शंकरलाल बालाप्रसाद लढा, रा. साईबाबा मंदिरा जवळ, भोकर रोड मुदखेड ता. मुदखेड जि. नांदेड | ज.मा.अ. नगर परिषद कार्यालय मुदखेड जि. नांदेड | मुख्याधिकारी, नगर परिषद मुदखेड जि. नांदेड | |
| 79 | 3500/ 2023 | श्री. शंकरलाल बालाप्रसाद लढा, रा. साईबाबा मंदिरा जवळ, भोकर रोड मुदखेड ता. मुदखेड जि. नांदेड | ज.मा.अ. नगर परिषद कार्यालय मुदखेड जि. नांदेड | मुख्याधिकारी, नगर परिषद मुदखेड जि. नांदेड | |
| 80 | 1212/ 2023 | श्री. पंडीत दोलतराव तिडके, मु.पो. श्रीकृष्ण निवास, प्रभाग क्र. 07, शंकर नगर सेनगांव ता. सेनगांव जि. हिंगोली | उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग नांदेड | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग नांदेड | |
| | | सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी | | लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी | |

| | | सुनावणीचा दि. 15.07.2025 | | वेळ दुपारी 02.30 वा. | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | अपील क्र. | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी | शेरा |
| 81 | 1278/2023 | श्री. सय्यद विलाल स. अफसर, रा. गल्ली नं. 10, पिरबुऱ्हाण नगर, नांदेड | कार्यकारी अभियंता, कार्यालय, सार्वजनिक बांधकाम विभाग नांदेड | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग नांदेड | |
| 82 | 1317/2023 | श्री. मधुकर कांबळे सलगरकर, रा. सोनाई निवास, राहुलनगर, वाघाळा ता. जि. नांदेड | वरिष्ठ लिपीक, सार्वजनिक बांधकाम विभाग देगलुर जि. नांदेड | उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग देगलुर जि. नांदेड | |
| 83 | 1408/2023 | श्री. अनुप श्रीराम आगाशे, रा. मयुर अपार्टमेंन्ट प्लॉट नं. 4, कैलास नगर, नांदेड-431605 | प्रथम लिपीक, सार्वजनिक बांधकाम विभाग, महात्मा फुले शाळा रस्ता स्नेहनगर नांदेड | उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, महात्मा फुले शाळा रस्ता स्नेहनगर नांदेड | |
| 84 | 1409/2023 | श्री. अनुप श्रीराम आगाशे, रा. मयुर अपार्टमेंन्ट प्लॉट नं. 4, कैलास नगर, नांदेड-431605 | प्रथम लिपीक, सार्वजनिक बांधकाम विभाग, महात्मा फुले शाळा रस्ता स्नेहनगर नांदेड | उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, महात्मा फुले शाळा रस्ता स्नेहनगर नांदेड | |
| 85 | 2033/2023 | श्री. रामनारायण मयाराजी बंग, रा. घर नंबर 16, "नारायणी" मेन रोड, यशवंतनगर, नांदेड | प्रथम लिपीक, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड | |
| 86 | 2120/2023 | श्री. विवेक अरविंद कोमावार, मु.पो. उमरी बाजार ता. किनवट जि. नांदेड | सहाय्यक अभियंता श्रेणी-1, सार्वजनिक बांधकाम उपविभाग किनवट जि. नांदेड | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर जि. नांदेड | |
| 87 | 2354/2023 | श्री. योगेश गणपतराव जाकरे, रा. देशपांडे गल्ली, जामा मस्जिद जवळ, देगलुर ता. देगलुर जि. नांदेड | उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, देगलुर जि. नांदेड | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, देगलुर जि. नांदेड | |
| 88 | 3322/2023 | श्रीमती. गोदावरी गोरखनाथ कदम, रा. सोन्ना ता. पुर्णा परभणी | अधिक्षक, सार्वजनिक बांधकाम मंडळ नांदेड | सहाय्यक अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ नांदेड | |
| 89 | 3968/2023 | श्री. रणजीत जळबाजी गवळे, रा. डॉ. आंबेडकर नगर, नांदेड | निवीदा शाखा सार्वजनिक बांधकाम विभाग भोकर जि. नांदेड | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग भोकर जि. नांदेड | |
| 90 | 4945/2023 | श्री. पांडुरंग पि. संभाजी बुक्तरे, रा. घर नबंर 1-10-168, प्रभात नगर जंगमवाडी रोड, नागसेन शाळेजवळ, नांदेड | शाखा अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग उत्त नांदेड | उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग उत्त नांदेड | |
| | | सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी | | लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी | |

| | | सुनावणीचा दि. 15.07.2025 | | वेळ दुपारी 02.30 वा. | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | अपील क्र. | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी | शेरा |
| 91 | 5878/ 2023 | श्री. अशोक बाबाराव कदम, मु.पो. मंगलसांवगी ता. कंधार जि. नांदेड | प्रथम लिपक, सार्वजनिक बांधकाम विभाग नांदेड | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग स्नेहनगर, नांदेड | |
| 92 | 6176/ 2023 | श्री. पठाण जोहरखान मोहेदीन, मु.पो. मुगट ता. मुदखेड जि. नांदेड | ज.मा.अ. सार्वजनिक बांधकाम उपविभाग, मुदखेड जि. नांदेड | उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, मुदखेड जि. नांदेड | |
| 93 | 6370/ 2023 | सौ. शकुंतला शामसुंदर देशपांडे, रा. S&B हनुमान मंदिरा समोर, आनंदनगर वसमत रोड, परभणी | अधिक्षक, अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ नांदेड | अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ नांदेड | |
| 94 | 7278/ 2023 | श्री. सोमेश मारोतीराव कलेटवाड, रा. नाटकर गल्ली, व्यंकटेश पुज्जलवार यांचा वाडा देगलुर ता. देगलुर जि. नांदेड | उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, देगलुर जि. नांदेड | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, देगलुर जि. नांदेड | |
| 95 | 7279/ 2023 | श्री. सोमेश मारोतीराव कलेटवाड, रा. नाटकर गल्ली, व्यंकटेश पुज्जलवार यांचा वाडा देगलुर ता. देगलुर जि. नांदेड | उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, देगलुर जि. नांदेड | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, देगलुर जि. नांदेड | |
| 96 | 8378/ 2023 | श्री. मिंदे गंगाराम रा. शिवशक्ती नगर, मिलरोड, नांदेड | ज.मा.अ. सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड | |
| 97 | 8379/ 2023 | श्री. मिंदे गंगाराम रा. शिवशक्ती नगर, मिलरोड, नांदेड | ज.मा.अ. सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड | |
| 98 | 7318/ 2023 | श्री. तुकाराम संतोबा पवार, रा. रा. वाहेगाव ता. जि. नांदेड | उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधमा उपविभाग दक्षिण नांदेड | कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड | |
| 99 | 10727 /2021 | श्री. रमेश गोरसिंग पवार, रा. भिलडोंगर पो. शेंदुरजना (अ), ता. मनोरा जि. वाशिम | उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर जि. नांदेड | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर जि. नांदेड | |
| 100 | 6850/ 2023 | श्री. मोहम्मद अब्दुल मुख्तार, रा. संपादक दैनिक गोदावरी ऑब्झर्वर, वजीरावाद, नांदेड | व्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र उदयोग भवन शिवाजीनगर, नांदेड | महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र उदयोग भवन शिवाजीनगर, नांदेड | |
| | | सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी | | लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी | |

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**व्दितीय अपील क्रमांक - २८३, ३४८ ते ३५०, ६०० ते ६०६, ९९६, २१९१, ४५१५, ५३३१, ५३४१, ८०५६, ८०५७, ८३२७, ८३२८, व १५६२ /२०२४ (२१)**

श्री.प्रकाश गणपती सोनार, — अपिलार्थी
रा.जवळे (दु), पो.खामगाव, ता.जि.धाराशिव

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा (बोर्ड क्र.०१ ते २०) — : उत्तरवादी क्र. १
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, जवळे (दु), ता.जि.धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र. २
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, धाराशिव

३ जन माहिती अधिकारी तथा (बोर्ड क्र.२१) — : उत्तरवादी क्र. १
सहायक प्रशासन अधिकारी,
पंचायत समिती, धाराशिव

४. प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र. २
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, धाराशिव

(सुनावणी दिनांक १५.०७.२०२५)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये २१ व्दितीय अपील दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री.मेनकुदळे बी.एम., तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्रीमती पी.एम.डांगे, प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं), श्री.ढाकणे एस.एस., जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रशासन अधिकारी, श्री.घोंगडे संजय हणमंतराव उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या २१ जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ०१ | ०४.१०.२०२३ | मौजे जवळे (दु), ता.जि.धाराशिव येथील ग्रामपंचायतमध्ये आपले सरकार सेवा केंद्र |

| | | |
|---|---|---|
| | | सुरु झाल्यापासुन ते आजपर्यंत ग्रामपंचायतीने थेट कंपनीला (सीएससी कंपनी) चेकव्दारे दिलेला निधी आणि कंपनीकडुन प्राप्त झालेले रीम, टोनर व हार्डवेअर इ. साहित्य याची माहिती, सन २०१६ ते २०२३, |
| ०२ | २१.०९.२०२३ | सन २०२०-२१ ते २०२१-२०२२ या आर्थिक वर्षात ग्रामपंचायत जवळे दु. येथील मागासवर्गीयांसाठी १५ टक्के व महिला बालकल्याण १० टक्के करावयाच्या खर्चाचे मासिक विवरण नोंद केलेल्या नमुना २८ च्या छायांकित तसेच नमूद काळात केलेल्या खर्चाच्या मासिक विवरणाचा अहवाल गट विकास अधिकारी यांना सादर केल्याबाबतची माहिती व त्याच्या प्रती साक्षांकित करुन द्याव्या, |
| ०३ | २५.०९.२०२३ | मौजे जवळे दु. येथील ग्रामपंचायतच्या नमुना नं.०६ मधील सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाच्या (एप्रिल २०२० ते मार्च २०२१) प्रत्येक महिन्याच्या जमा केलेल्या रकमांची माहिती (विवरण) साक्षांकित करुन देण्यात यावी, |
| ०४ | २५.०९.२०२३ | मौजे जवळे दु. ग्रामपंचायतच्या सन २०२०-२१ या आर्थिक वर्षातील प्रत्येक महिन्याच्या (एप्रिल २०२० ते मार्च २०२१) जमा खर्चाचे मासिक विवरण नमुना नं.२६-क व नमुना नं.२६-ख प्रमाणे संपूर्ण माहिती साक्षांकित करुन द्यावी, |
| ०५ | २७.०९.२०२३ | ग्रामपंचायत जवळे दु. येथील सामान्य रोकडवही नमुना ५ मधील ३० ऑगस्ट ते १८ आक्टोबर २०२० पर्यंत दैनंदिन जमा व खर्च केलेल्या रकमांची माहिती, |
| ०६ | २७.०९.२०२३ | ग्रामपंचायत जवळे दु. येथील सामान्य रोकड वही नमुना ५ मधील १९ ऑक्टोबर २०२० ते ०७ डिसेंबर २०२० पर्यंत दैनंदिन जमा व खर्च केलेल्या रकमांची माहिती, |
| ०७ | २७.०९.२०२३ | ग्रामपंचायत जवळे दु. येथील सामान्य रोकड वही नमुना ५ मधील ०८ डिसेंबर २०२० ते २६ जानेवारी २०२१ पर्यंत दैनंदिन जमा व खर्च केलेल्या रकमांची माहिती, |
| ०८ | २७.०९.२०२३ | ग्रामपंचायत जवळे दु. येथील सामान्य रोकड वही नमुना ५ मधील २७ जानेवारी २०२१ ते ३१ मार्च २०२१ पर्यंत दैनंदिन जमा व खर्च केलेल्या रकमांची माहिती, |
| ०९ | २७.०९.२०२३ | ग्रामपंचायत जवळे दु. येथील सामान्य रोकड वही नमुना ५ मधील १० जुलै ते २९ ऑगस्ट २०२० दैनंदिन जमा व खर्च केलेल्या रकमांची माहिती, |
| १० | २७.०९.२०२३ | ग्रामपंचायत जवळे दु. येथील सामान्य रोकड वही नमुना ५ मधील २१ मे २०२० ते ०९ जुलै पर्यंत दैनंदिन जमा व खर्च केलेल्या रकमांची माहिती, |
| ११ | २७.०९.२०२३ | ग्रामपंचायत जवळे दु. येथील सामान्य रोकड वही नमुना नं.५ मधील ०१ एप्रिल २०२० ते २० मे २०२० पर्यंत दैनंदिन जमा व खर्च केलेल्या रकमांची माहिती, |
| १२ | १६.१०.२०२३ | ग्रामपंचायत हद्दीतील असलेल्या मोबाईल टॉवर संबंधातील माहिती, मोबाईल टॉवर स्थापन केलेपासुन आजपर्यंत, |
| १३ | १८.११.२०२३ | ग्रामपंचायत जवळे दु. येथे जुन २०२२ ते नोव्हेंबर २०२३ पर्यंतचया कालावधीमध्ये घेण्यात आलेल्या प्रत्येक मासिक सभेच्या प्रोसेडिंगच्या नकला उपस्थित सदस्यांच्या स्वाक्षऱ्यासहीत, |
| १४ | ०३.०१.२०२४ | पंचायत समिती कार्यालय, धाराशिव गटविकास अधिकारी यांनी दि.१५.१२.२०२३ रोजी पत्र क्र.जा.क्र.पंसधा/प्रापवि-१/कावि१७७० सरपंच व ग्रामसेवकांना दिल्यावरुन ग्रामपंचायत स्तरावरील शिपाई या पदावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्याने आठवड्यातील तीन दिवस गावातील शाळेत साफसफाईचे काम करण्याबाबत ग्रामपंचायत स्तरावरुन आवश्यक त्या नियमानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल देण्यात यावा, |
| १५ | ०७.११.२०२३ | ग्रामपंचायत कार्यालय जवळे दु. येथील आपले सरकार सेवा केंद्राच्या संदर्भात खालील मुद्यांची माहिती द्यावी,<br>अ.संगणक परिचालकाचे आठवड्यातील कामाचे दिवस, |

| | | |
|---|---|---|
| | | ब.संगणक परिचालकाच्या आठवड्यातील कामाचे दिवस ठरविणाऱ्या शासकीय अधिकाऱ्याचे नाव व पदनाम,<br>क.संगणक परिचालकाचे कामाचे दिवस निश्चित करण्यासाठी दिलेले शासनाचे पत्र अथवा अधिसुचना अथवा शासन निर्णय, |
| १६ | १५.१२.२०२३ | सन २०१९ ते २०२३, मौजे जवळे दु. ग्रामपंचायत मधील संगणक सन २०१९ पासुन आजपर्यंत बंद असल्यामुळे आपले सरकार सेवा केंद्रातुन नागरिकांना ऑनलाईन दाखले, प्रमाणपत्र मिळत नाहीत, त्या अनुषंगाने खालील मुद्यांची माहिती द्यावी,<br>१. सन २०१९ ते अद्याप संगणक बंद असण्यास जबाबदार असणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची नावे व पदनामे याची माहिती,<br>२. वरील कालावधी दरम्यान संगणक परिचालकाने केलेल्या कामाची माहिती द्यावी, |
| १७ | १३.०२.२०२४ | दि.०३.११.२०२१ रोजी दिलेल्या स्मरणपत्र ०१ नुसार सुचित केल्याप्रमाणे विषयांकित प्रकरणात नियमानुसार मुदतीत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल देण्यात यावा, |
| १८ | २३.०४.२०२४ | दि.१७.०१.२०२४ रोजीच्या विनंती अर्जातील नमूद विषयाच्या अनुषंगाने ग्रामपंचायत कालावधी सन २०१७ ते २०२२ मधील सदस्यांचा नियमानुसार देय असलेला मासिक बैठक भत्ता देण्यासंदर्भात आपल्या कार्यालयाकडुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल द्यावी, |
| १९ | ०३.०६.२०२४ | डिसेंबर २०२३ ते मे २०२४ पर्यंतच्या कालावधीमध्ये ग्रामपंचायत जवळे दु. येथे घेण्यात आलेल्या प्रत्येक मासिक सभेच्या तसेच सर्व ग्रामसभांच्या प्रोसेडिंगच्या नकला उपस्थित सदस्य व ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्यासहीत साक्षांकित करुन देण्यात याव्यात, |
| २० | २४.०५.२०२४ | सन २०१९-२० ते २०२२-२३ पर्यंत ग्रामपंचायत जवळे दु. येथील कर्मचारी, सरपंच, उपसरपंच व ग्रामसेवक त्यांना प्रदान करण्यात आलेली प्रवासभत्ता याची माहिती, |
| २१ | २६.०८.२०२३ | महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम १४० व लेखापरीक्षा आक्षेप व अनुपालन प्रक्रियेनुसार ग्रामसेवकाने ग्रामपंचायतीच्या लेखापरिक्षणांतील नमूद केलेल्या आक्षेपांची पुर्तता तीन महिन्यात करुन तसा अहवाल पंचायत समितीकडे सादर न केल्यास त्यांनी केलेल्या कर्तव्यपालनातील कसुरीबाबत करण्यात येणाऱ्या शिस्तभंगविषयक कार्यवाहीची माहिती द्यावी, |

२. आज रोजी सुनावणीदरम्यान उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी हे वारंवार मोठ्या प्रमाणात माहितीचे अर्ज सादर करुन नाहकपणे एकाच विषयाची संबंधित माहिती मागवत असतात. अपिलार्थी यांना माहिती देण्याचा प्रयत्न केला असता ते माहिती घेण्यास नकार देतात, अपील केले असल्यामुळे आदेश मिळाल्यावर माहिती द्या असे म्हणून अपिलार्थी माहिती घेत नाहीत. अपिलार्थी प्रथम अपील सुनावणीस गैरहजर राहतात, तसेच ते आज रोजीच्या आयोगासमोरील सुनावणीस देखील अनुपस्थित आहेत. अपिलार्थी एकाच विषयाची माहिती वेगवेगळ्या माध्यमातुन जसे की, ऑनलाईन पोर्टल, माहिती अधिकार, लोकसेवा हक्क अध्यादेश, जिल्हाधिकारी कार्यालय या मार्फत वारंवार अर्ज करुन नाहकपणे त्रास देतात. अपिलार्थी एकाच दिवशी १० ते १२ किंवा पंधरा दिवसाला सरासरी दोन अर्ज सादर करतात. अपिलार्थी यांच्या अशा कृतीमुळे प्रशासनाचा अधिक वेळ अर्ज निकाली काढण्यातच जात आहे. त्यामुळे प्रशासन व सामान्य जनता यामधील महत्वाचे विकासाचे काम प्रलंबित राहत आहे. अपिलार्थी यांचा मानस फक्त जन माहिती अधिकारी यांचेवर कारवाई व्हावी असाच असुन असा उद्देश ठेवुन अर्ज करणे ऐवढाच आहे. अपिलार्थी यांच्या अमर्याद अर्ज फाटे करण्याच्या सवयीमुळे प्रशासनावर दबाब येऊन कामकाज करताना कुचंबना होत असुन यामुळे मानसिक खच्चीकरण होत आहे. अपिलार्थी यांना माहिती अधिकारातंर्गत सादर केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने उपलब्ध असलेली माहिती / वस्तुस्थिती वेळोवेळी उपलब्ध करुन

दिलेली असतानाही देखील ते माहिती दिली नाही / प्रतिसाद दिला नाही, असा कारणाचा ऊहापोह करुन प्रथम अपील सादर करतात. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला असतानाही व जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिलेली असतानाही अपिलार्थी आयोगाकडे व्दितीय अपिले दाखल करतात.

३. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे. अपिलार्थी हे मोठ्या प्रमाणावर माहिती अर्ज सादर करतात आणि जवळजवळ तेवढेच प्रथम अपिले सादर करतात. अपिलार्थी यांच्या अशा वारंवार मोठ्या प्रमाणावर अर्ज करण्याच्या भूमिकेचा विपरित परिणाम दैनंदिन शासकीय कामकाजावर होऊन नियमित शासकीय कामे प्रलंबित राहुन गरजू नागरिकांना नैसर्गिक न्याय देता येणे शक्य होत नाही.

४. माहिती अधिकार कायद्यामध्ये माहिती मागण्याबाबत कुठल्याही प्रकारचा प्रतिबंध नसला तरी माहितीचा मूळ उद्देश हा आहे की, शासकीय कामात पारदर्शकता आणून जनतेला माहिती मिळावी आणि शासकीय कामात कार्य तत्परता असावी असा आहे. वारंवार माहिती अर्ज केल्याने शासकीय कामात अडथळा निर्माण होऊन शासकीय कामकाजावर त्याचा विपरीत परिणाम होतो व अशा प्रकारची माहिती जमा करण्यासाठी शासकीय यंत्रणेच्या वेळेचा अपव्यय होतो.

एकाच व्यक्तीने मोठ्या संख्येने माहिती अधिकार कायद्याखाली माहिती अर्ज / अपिले करणे माहिती अधिकार कायद्यामध्ये अभिप्रेत / अपेक्षित नाही. यावरुन अपिलार्थी हे माहिती अधिकार कायद्याचा दुरुपयोग करुन संबंधित शासकीय कार्यालयास / प्राधिकरणास वेठीस धरत असुन त्यांच्या या कृतीमुळे संबंधित शासकीय कार्यालयाचे / प्राधिकरणांचे दैनंदिन कामकाज ठप्प होण्याचा गंभीर धोका निर्माण झाला आहे. अशा मोठ्या स्वरुपात अर्ज करण्याच्या सवयींमुळे संबंधित शासकीय कार्यालये / प्राधिकरणे यांचा बहुमुल्य वेळ व शक्ती अधिक प्रमाणात खर्ची पडुन सदर शासकीय कार्यालयांकडुन सर्व सामान्य जनतेला ज्या सेवा देणे अभिप्रेत आहे त्या महत्वाच्या शासकीय कामकाजावर गंभीर परिणाम होण्याचा धोका देखील निर्माण झालेला आहे.

५. प्रस्तुत प्रकरणाच्या अनुषंगाने, मा.सर्वोच्च न्यायालयाने, सिव्हील अपील ६४५४/२०११, दिनांक ०९.०८.२०११ रोजी या प्रकरणी Appealicants Central Board of Secondary Education & Anr. Vs Aditya Bandopadhyay & Ors. Respondents या प्रकरणी दिलेल्या निर्णयामध्ये, माहिती अधिकाराचा योग्य वापर होणेबाबत लक्ष वेधले असुन या निर्णयामध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने खालील आदेश दिले आहेत.

"The Act should not be allowed to misused or abused, or to become a tool to abstract the national development and integration, or to destroy the peace, tranquility and harmony among its citizens. Nor should it be converted into a tool of oppression or intimidation of honest officials striving to the tot do their duty-Nation does not want a scenarios where ७५ % of the staff of public authorities spend ७५ % of their time in collecting and furnishing information to applicants instead of discharging their regular duties. The threat of penalties under the RTI Act and pressure of the authorities under the Act should not lead to employees of a public authorities prioritizing information furnishing, at the cost of their normal and regular duties."

तसेच शासकीय कामकाजावर विपरीत परिणाम होतो व अशा प्रकारची माहिती जमा करण्यासाठी शासकीय यंत्रणेचा वेळेचा अपव्यय होतो. त्यानुसार प्रस्तुत कायद्याचा मुख्य उद्देश कामकाजात पारदर्शकता, सामान्य जनतेला / नागरीकांना माहिती मिळावी आणि जनतेने माहिती जाणून घेऊन शासकीय कामकाज कार्यक्षम होणे व त्यात समन्वय प्रस्थापित होणे हा आहे. जर अशाप्रकारे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ या कायद्याचा दुरुपयोग झाल्यास निश्चितपणे शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना मुख्य कार्यालयीन कामकाज सोडुन प्राप्त माहिती अर्जावर अधिनियमाप्रमाणे कामकाज करावे लागेल. त्यामुळे शासकीय यंत्रणेच्या वेळेचा अपव्यय होऊन त्याचा विपरीत परिणाम शासकीय कामकाजावर होईल.

६. यावरुन माहिती अधिकार कायद्यातंर्गत पुन्हा पुन्हा माहितीची मागणी केल्याने जन माहिती अधिकारी अपिलाशी संबंधित कर्मचारी, सार्वजनिक प्राधिकरण, प्रथम अपिलीय अधिकारी यांना त्यांचा मौल्यवान वेळ इतर शासकीय कामकाज करण्यासाठी देणे शक्य होत नाही. तसेच पुन्हा तोच विषय व्दितीय अपिलापर्यंत आल्यास माहिती आयोगाला क्रमवारीनुसार प्राप्त झालेल्या इतर व्दितीय अपिलांच्या सुनावणीसाठी वेळ देणे शक्य होत नाही.

उपरोक्त सर्व बाबी तसेच मा.सर्वोच्च न्यायालयाकडील निर्णय विचारात घेता, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये मागणी केलेल्या माहितीतून कोणतेही व्यापक जनहित साध्य होत असल्याचे स्पष्ट होत नाही. वारंवार मोठ्या प्रमाणात माहितीचे अर्ज करुन मागणी केलेल्या माहितीच्या मागणीमुळे शासकीय यंत्रणेतील मनुष्यबळ व साधन सामग्री यावर ताण येऊन सर्वसामान्य नागरिकांच्या दैनंदिन शासकीय कामे पूर्ण करण्याच्या शासकीय कार्यालयाच्या / प्राधिकरणाच्या क्षमतेवर विपरित परिणाम होऊन शासकीय कामकाजाचा खोळंबा होईल व असे माहिती अधिकार कायद्यास अभिप्रेत नाही, असे आयोगाचे स्पष्ट मत झालेले आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. अपिलार्थी यांची उपरोक्त २१ व्दितीय अपिले फेटाळण्यात येत आहेत.

२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, धाराशिव यांना असे निर्देशित करण्यात येते की, प्रस्तुत आदेशाची जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा धाराशिव यांचेमार्फत व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी. तसेच सदर आदेश आपल्या अधिनस्त कार्यालयातील सुचना फलकावर लावून आपल्या स्तरावरुन सुध्दा व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 8136 दिनांक : 18/07/2025

प्रत :- माहिती तथा यथाशिघ्र कार्यवाहीसाठी अग्रेषित,
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, धाराशिव

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक - २५४५ ते २५४८ व ८११२ ते ८१२८/२०२४**
**(२१)**

श्री.बाबुराव जोतिबा चव्हाण, — अपिलार्थी
रा.बामणी, ता.जि.धाराशिव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, बामणी, ता.जि.धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, धाराशिव

**(सुनावणी दिनांक १५.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०३.०४.२०२४ (०४) व दि.१६.०८.२०२४ (१७) रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये २१ द्वितीय अपील दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व अपिलार्थी यांचे प्रतिनिधी (मुलगा), जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री.कुंभार पी.डी. व प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), श्री.ढाकणे एस.एस. उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या २१ जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| २२ | ०९.०१.२०२४ | नि.दि.दा.क्र.६८१/२०२२ या दिवाणी दाव्यासंदर्भात बामणी येथील ग्रामसेवकाने ०१ नोव्हेंबर २०१२ ते आजतागायत जानेवारी २०२४ या कालावधीमध्ये ग्रामपंचायत गायरानच्या लोकांच्या नोंदीच्या गट नंबर ४५१ चा ७/१२, ८अ चा उतारा व नकाशाची प्रती मिळणेबाबत व ग्रामपंचायत गावठाणच्या लोकांच्या नोंदीचा ७/१२, ८अ या उतारा व नकाशाची प्रती, |
| २३ | ०९.०१.२०२४ | बामणी येथील ग्रामसेवकाने दि.०१.११.२०१२ ते जानेवारी २०२४ या कालावधीतील ग्रामसभेच्या घेतलेल्या सर्व विषयाच्या मासिक बैठकीचे ठरावांच्या व प्रोसेडिंगच्या सर्व सत्यप्रती ग्रामसेवकाने देऊन, एक नंबर खात्यावरील आतापर्यंत जमा झालेली व आजपर्यंत केलेला आर्थिक ताळेबंदीचा पुराव्यासह हिशोब, काऊंटर स्लीप, चेकबुक, पासबुक, कॅशबुक, जमा खर्च नोंदवही... |
| २४ | ०९.०१.२०२४ | नि.दि.दा.क्र.६८१/२०२२ या दिवाणी दाव्यातील प्रतिवाद्याच्या संदर्भातील माझ्या बाजुने |

| | | |
|---|---|---|
| | | व गैरअर्जदारांच्या विरोधात मा.कोर्टाने निकाल दिलेल्या निरंतर मनाई हुकूमाच्या आदेशातील घरजागेसंदर्भात १० मुद्यांवर माहिती, |
| २५ | ०९.०१.२०२४ | नि.दि.दा.क्र.६८१/२०२२ या दिवाणी दाव्यासंदर्भात बामणी येथील रहिवाशी श्री.शहाजी बाबुराव चव्हाण व सौ.गोकर्णा शहाजी चव्हाण यांची ग्रामसेवकाने ग्रामपंचायत गायरान किंवा गावठाणामध्ये ५०००/- रु.चा कर भरणा करुन त्याची भोगवटधारक म्हणून नोंद घेतली आहे का, नोंद घेतली असेल ती कोण-कोणत्या कागदपत्राच्या आधारे घेतली, ग्रामपंचायत ठरावाच्या व प्रोसेडिंगच्या प्रतीसह.. |
| २६ | १६.०४.२०२४ | माहिती अर्जात नमूद ०१ ते ०५ च्या सर्व व्यक्तीची ग्रामसेवक व सरपंच यांच्याकडुन जन्मनोंद प्रमाणपत्र व विवाह नोंदणी प्रमाणपत्र याची सर्व अचूक माहिती मिळणेबाबत, |
| २७ | १६.०४.२०२४ | माहिती अर्जात नमूद ०१ ते ०५ च्या सर्व व्यक्तीची ग्रामसेवक व सरपंच यांच्याकडुन अपत्य प्रमाणपत्र व वारस / वारसाचे प्रमाणपत्र याची सर्व अचूक माहिती मिळणेबाबत, |
| २८ | १६.०४.२०२४ | बामणी ग्रामपंचायतमधील घरजागा मिळकत क्रमांक २०७, २४१, ८० व १६९ घरजागेबाबत नोंदी घेणे व नोंदी कमी करणे बाबतचे सर्व ग्रामपंचायत ठराव, खरेदीखत, वाटणीपत्र, सहमतीपत्र यांच्या कागदपत्राच्या प्रतीची अचूक माहिती, |
| २९ | १६.०४.२०२४ | बामणी ग्रामपंचायतीने दि.०१.११.२०१७ ते दि.३०.०४.२०२४ या कालावधीमधील श्री.राजेंद्र जोतीबा चव्हाण, त्यांची पत्नी, मुलगा यांच्या नावावर स्वत:चे घर, जेसीबी, ट्रॅक्टर, बोलोरो जिप, १२ एकरांच्या वर बागायत शेती, विहिर, बोरवेल, अशा सदन व श्रीमंत व्यक्तीच्या नावावर ग्रामसेवक व सरपंच यांनी ग्रामपंचायत गावठाण जागेत भोगवटाधारक म्हणून नोंदी घेतलेल्या आहेत त्या कारणांचा व नोंदी घेण्यास सांगितलेल्या आदेशाच्या अहवालाची माहिती, |
| ३० | १६.०४.२०२४ | माहिती अर्जातील क्र.०१ ते ०४ च्या सर्व व्यक्तीकडुन ग्रामसेवक व सरपंच यांच्याकडुन वसुल केलेली व घेतलेल्या विविध करांच्या पावत्याची सर्व अचूक माहिती, |
| ३१ | १६.०४.२०२४ | बामणी येथील रहिवाशी श्री.बंब्रु / बब्रु उर्फ बब्रुवान जोतीबा चव्हाण यांच्या ग्रामपंचायत घरजागा मिळकत क्रमांक २४० घरजागेच्या दिशा व नोंदीच्या दुरुस्ती ह्या कोण-कोणत्या कागदपत्राच्या आधारे करण्यात केलेल्या आहेत त्या कागदपत्राच्या प्रतीची अचूक माहिती, |
| ३२ | १६.०४.२०२४ | बामणी ग्रामपंचायत मधील घरजागा मिळकत क्रमांक २३९, २४०, २४१, १६५/३, १६९, १६५/१, ८२४, १६५/२, २०७, ८०, ६२, ४३, ४५ घरजागेबाबत नोंदी घेणे व नोंदी कमी करणे बाबतचे सर्व ठराव, खरेदीखत, स्टॅम्प, वाटणीपत्र, सहमतीपत्र यांच्या अचूक कागदपत्राच्या प्रतीची अचूक माहिती, |
| ३३ | ०२.०४.२०२४ | बामणी ग्रामपंचायत मधील सर्व विषयाचे ग्रामपंचायत ठराव, मासिक ग्रामसभेचे ठराव, फेरफार ठराव प्रती, प्रोसेडिंग ठराव प्रती, प्रोसेडिंगवर व ठरावांवर केलेल्या सत्य स्वाक्षरीचे नमुने प्रतीची अचूक माहिती, |
| ३४ | १६.०४.२०२४ | बामणी ग्रामपंचायत मधील घरजागा मिळकत क्रमांक २३९, २४०, २४१, १६५/३, २०७, १६९, ८२४, ८० व गावठाण घरजागा मिळकत क्रमांक ६२, ४३, ४५ या घरजागेचे प्रत्येकी ०२ दोन दोन प्रतीमध्ये ग्रामपंचायत उतारा अचूक माहिती, |
| ३५ | ०२.०४.२०२४ | नि.दि.दा.क्र.६८१/२०२२ या दिवाणी दाव्यासंदर्भात बामणी येथील श्री.शहाजी बाबुराव चव्हाण हे कोर्टाच्या मनाई हुकूमाच्या आदेशातील मि.क्र.२३९ च्या रितसर प्रत्यक्ष मोजणी करण्यात आलेल्या घरजागेत ५ फुटामध्ये राहत असल्याचे दिसुन आले व उर्वरित जागा ही ग्रामपंचायत गावठाणमध्ये राहतात असे ग्रामसेवक श्री.कुंभार यांनी दि.३१.०७.२०२३ चा विनंती अर्ज क्र.१, २, ३ च्या विनंती अर्जानुसार लेखी स्वरुपातील माहितीचा अहवाल दि.०८.०८.२०२३ रोजी दिलेला आहे,<br>मा.न्यायालयाच्या मनाई हुकूमाच्या आदेशातील घरजागा मि.क्र.२३९, घरजागेत पूर्व-पश्चिम दक्षिण-उत्तर लांबी रुंदीच्या फुटातील व क्षेत्र फळाचा चतु:सिमेसह प्रत्यक्ष |

| | | |
|---|---|---|
| | | स्थळदर्शक ५ फुटाच्या राहत्या घरजागा नकाशाची प्रत व मोजणी केल्यानंतरच्या गैरअर्जदाराने ५ फुटाचा कब्जा केलेल्या चतु:सिमेसह दर्शक घरजागेच्या पंचनामा अहवालाची प्रत, घरजागेचा ८ अचा उतारा प्रत पुराव्यासह, |
| ३६ | १६.०४.२०२४ | बामणी ग्रामपंचायत मधील गावठाण घरजागा मिळकत क्रमांक ६२, ४३ व ४५ घरजागेबाबत नोंदी घेणेबाबतचे ग्रामपंचायत प्रोसेडिंग ठराव, खरेदीखत, वाटणीपत्र, सहमतीपत्र, ५००० रुपये भरलेली कर पावतीची दुय्यम सत्यप्रती व गावठाणजागा नोंदीबाबतचा वरिष्ठ कार्यालयाचा शासन आदेश, जीआर, परिपत्रक याच्या कागदपत्राच्या प्रती, |
| ३७ | १६.०४.२०२४ | बामणी ग्रामपंचायत मधील घरजागेच्या मोजणी केलेल्या लोकांची यादी, मोजणी फीसच्या पावत्यांच्या प्रती व घरजागा मोजणीचा वरिष्ठ कार्यालयाचा शासननिर्णय आदेश, जीआर, परिपत्रक व ग्रामपंचायत घरजागामोजणी करुन देणेबाबतचा ठराव याबाबतच्या प्रतीची माहिती, |
| ३८ | १६.०४.२०२४ | बामणी ग्रामपंचायत मधील गायरान व गावठाणमध्ये ६३ लोकांच्या किंवा त्याहीपेक्षा जास्त लोकांच्या नोंदीची यादी, गाव नमुना ८ अ च्या सर्व लोकांच्या उतारा प्रती, कर स्वरुपात घेतलेल्या व दिलेल्या ५००० रु.च्या पावत्याची प्रती, वसुली केलेली एकुण रक्कम व खर्च केलेली एकूण रक्कम यांचा आर्थिक ताळेबंदीचा हिशोब, काऊंटर स्लीप, चेकबुक, पासबुक, कॅशबुक, जमा खर्च नोंदवही यांच्या कागदपत्राच्या प्रतीची माहिती, |
| ३९ | १६.०४.२०२४ | बामणी ग्रामपंचायतीच्या गावठाण व गायरानचा ७/१२, ८ अ व गाव नमुना यांचा उतारा प्रत व नकाशांची प्रती व गावठाण व गायरानमध्ये भोगवटाधारक म्हणून नोंदी घेण्यासंदर्भात वरिष्ठ कार्यालयाचा शासन आदेश, निर्णय, जीआर, शासन परिपत्रक, सुचनापत्र यांच्या कागदपत्राच्या प्रतीची माहिती, |
| ४० | १६.०४.२०२४ | बामणी ग्रामपंचायतीमधील दि.०१.११.२०१७ ते दि.३०.०४.२०२४ या कालावधीमधील ग्रामपंचायतीच्या गावठाण व गायरान जागेत तत्कालीन माजी ग्रामसेवक श्री.कांबळे लक्ष्मण, सरपंच सौ.गोदावरी अभिमान शेळके, उपसरपंच, माजी ग्रामपंचायतीचे सर्व पुरुष व महिला सदस्य, अध्यक्ष, सुचक, अनुमोदक, विद्यमान ग्रामसेवक पी.डी.कुंभार या सर्व व्यक्तीच्या स्वाक्षरी व सह्यांचे प्रत्येकी पाच पाच नमुने, |
| ४१ | १६.०४.२०२४ | बामणी ग्रामपंचायतीमधील दि.०१.११.२०१७ ते दि.३०.०४.२०२४ या कालावधीमधील विविध विकास कामे, विकास निधी, ठरावांच्या प्रती, आर्थिक ताळेबंदीचा हिशोब, कॅशबुक, किर्द, बँक पासबुक, काऊंटर स्लीप माहिती, |
| ४२ | १६.०४.२०२४ | बामणी ग्रामपंचायतमधील दि.०१.११.२०१७ ते दि.३०.०४.२०२४ या कालावधीमधील विविध विकास कामे, विकास निधी, ठरावाच्या प्रती, आर्थिक ताळेबंदीचा हिशोब, कॅशबुक, किर्द, बँक पासबुक, काऊंटर स्लीप सविस्तर माहिती, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांचे प्रतिनिधी (मुलगा) यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. मागणी केलेली माहिती वडिलांच्या मालमत्तेसंदर्भातील असुन झालेल्या अन्यायाविरुध्द न्यायालयात दाद मागण्याकरिता कागदपत्रांची आवश्यकता आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेशित केलेले आहे. तथापि या नंतरही माहिती देण्यात आलेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे. संबंधित ग्रामपंचायत कार्यालयाकडे जेवढे माहिती अर्ज दाखल केलेले आहेत त्या कोणत्याही अर्जाची दखल घेण्यात आलेली नाही. संबंधित जन माहिती अधिकारी यांनी प्रस्तुत प्रकरणातील माहिती अर्जाची दखल घेतली नसल्यामुळे त्यांचेविरुध्द दंडात्मक व शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित करावी. मागणी केलेली माहिती वेळेत दिली नसल्यामुळे जो मानसिक त्रास झाला त्याबद्दल अपिलार्थी यांना नुकसान भरपाई मंजूर करावी.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अधिकारातंर्गत मागणी केलेली माहिती कामाच्या व्यापात अपिलार्थीस देता आलेली नाही. परंतू अपिलार्थी यांनी कार्यालयाकडे जे

इतर अर्ज दाखल केलेले आहेत त्या अनुषंगाने त्यांना अभिलेखात उपलब्ध असलेले कागदपत्रे वेळोवेळी दिलेले आहेत. अपिलार्थी यांनी मागणी केलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे तात्काळ उपलब्ध करुन देण्यात येईल.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे. या निर्णयाव्दारे सात दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात आलेले आहे. अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी उपलब्ध करुन देतील ही बाब प्रथम अपिलीय अधिकारी या नात्याने व्यक्तिश: पाहण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, आदेश देऊनही माहिती दिली जात नसल्याबाबत, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांचे प्रतिनिधी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन सात दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. तथापि सदर प्रथम अपील निर्णयाची अंमलबजावणी झाली असल्याचे दिसुन येत नाही. या प्रकरणी अपिलार्थी यांनी सादर केलेल्या माहिती अर्जाची संख्या व माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप विचारात घेता, मागणी केलेली माहिती अपिलार्थीस अधिनियमातील कलम २ (J) नुसार अवलोकनास्तव उपलब्ध करुन देणे संयुक्तिक ठरेल, या निष्कर्षापत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, बामणी, ता.जि.धाराशिव यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.
२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, बामणी, ता.जि.धाराशिव यांनी अपिलार्थी यांच्या वर नमूद माहिती अर्जासंदर्भात विहित मुदतीत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह **दि.१५.०९.२०२५ रोजी आयोगासमोर व्यक्तिश:** उपस्थित राहुन सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी नमूद दिनांकास खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.
३. विस्तार अधिकारी, पंचायत समिती, धाराशिव यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.
४. उपरोक्त निर्देशासह २१ व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 8137 दिनांक :- 18/07/2025 / नोंदणीकृत टपालाव्दारे

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक - ८७४३/२०२४**
**बोर्ड क्र.४३**

श्री.वाघमारे लखन ज्ञानदेव,
रा.जवळे दु., ता.जि.धाराशिव — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, जवळे दु., ता.जि.धाराशिव — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, धाराशिव — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक १५.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२७.०९.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री.मेनकुदळे बी.एम., तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्रीमती डांगे पी.एम. व प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं), श्री.ढाकणे एस.एस. उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १५.०४.२०२४ | मौजे जवळे दु. गावातील लोकांनी ग्रामपंचायतीच्या हद्दीत अथवा रस्त्यावर केलेल्या विविध प्रकारच्या अतिक्रमणाच्या नोंदी घेण्याबाबत दि.२२.०३.२०२४ रोजी विनंती अर्ज केल्यावरुन आपल्या कार्यालयाकडुन करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जात व्यक्तिश: माहिती हवी असल्याचे नमूद केलेले आहे. तथापि व्यक्तिश: माहितीची मागणी करुन अपिलार्थी माहिती घेण्यासाठी कार्यालयात व्यक्तिश: उपस्थित राहिलेले नाहीत. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती त्यांना व्यक्तिश: देण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी माहिती स्विकारलेली नाही. आज रोजीच्या आयोगासमोरील सुनावणीच्या अनुषंगाने अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना आयोगासमोर देण्याकरिता सोबत देखील आणलेली आहे. आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे ती अपिलार्थी यांना देण्यात येईल.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२८.०६.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे. या निर्णयाव्दारे सात दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले

की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना देण्याकरिता सोबत आणलेले आहे. तथापि आज रोजी सुनावणीकरिता अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, जवळे दु., ता.जि.धाराशिव यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, धाराशिव यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 8665 दिनांक :- 23/07/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**व्दितीय अपील क्रमांक - ९५७३ व ९५७४/२०२४ (०२)**

श्री.सुधाकर मधुकर रणदिवे,
रा.जवळे दु., ता.धाराशिव — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, जवळे दु., ता.जि.धाराशिव — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, धाराशिव — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक १५.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२८.१०.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दोन व्दितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री.मेनकुदळे बी.एम., तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्रीमती डांगे पी.एम. व प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं), श्री.ढाकणे एस.एस. उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दोन जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ४४ | १६.०७.२०२४ | ग्रामपंचायत जवळे दु. येथील मे.२०२४ मध्ये घेतलेल्या ग्रामसभेचे प्रोसेडिंग द्यावे, |
| ४५ | १६.०७.२०२४ | ग्रामपंचायत जवळे दु. येथील सन २०२२-२३ या वर्षाचा ऑडिट रिपोर्ट द्यावा, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जात व्यक्तिश: माहिती हवी असल्याचे नमूद केलेले आहे. तथापि व्यक्तिश: माहितीची मागणी करुन अपिलार्थी माहिती घेण्यासाठी कार्यालयात व्यक्तिश: उपस्थित राहिलेले नाहीत. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती त्यांना व्यक्तिश: देण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी माहिती स्विकारलेली नाही. म्हणून अपिलार्थी यांनी मागणी केलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती दि.१०.१२.२०२४ रोजीच्या पत्रासोबत नोंदणीकृत टपालाव्दारे अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२४.०९.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे. या निर्णयाव्दारे सात दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती व प्रथम अपील अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर

सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

उपरोक्त दोन अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 8666 दिनांक : 23/07/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक - ७३०/२०२४
बोर्ड क्र.४६

श्री.तांबोळी मकबुल आल्लाउद्दीन,
रा.एस.टी.कॉलनी, तुळजापूर, ता.तुळजापूर, जि.धाराशिव — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
सहायक प्रशासन अधिकारी,
पंचायत समिती, धाराशिव — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, धाराशिव — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक १५.०७.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.२३.०१.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रशासन अधिकारी, श्री.घोंगडे संजय हणमंतराव उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०९.१०.२०२३ | शासन नियमानुसार ग्रामसेवक व ग्रामसेविका मुख्यालयी राहतात याची माहिती, सन २०२० ते आजपर्यंत,<br>१.आपल्या उस्मानाबाद तालुक्यात कार्यरत ग्रामसेवक व ग्रामसेविका मुख्यालयी राहत असल्यासंबंधी ग्रामपंचायतचा ठराव किंवा अन्य विभागाकडुन मुख्यालयी राहत असल्याचे कोणते पुरावे आपल्या कार्यालयाकडे किंवा वरिष्ठ कार्यालयाकडे सादर केले, सदर केलेल्या पुराव्यांची छायांकित प्रती,<br>२. शासनाकडुन मासिक किती घरभाडे देण्यात येत, घरमालकाच्या घरभाडे पावतीसह सर्व माहिती, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) नुसार सार्वजनिक प्राधिकरणाकडे उपलब्ध असलेलीच माहिती पुरविणे अभिप्रेत असुन जेथे वेगळ्याने माहितीचे संकलन, संशोधन अथवा पृथ:करण करणे आवश्यक आहे अशा स्वरुपातील माहिती पुरविणे अभिप्रेत नाही. अपिलार्थी यांनी ग्रामसेवक व ग्रामसेविका मुख्यालयी राहत असल्याबाबत मागणी केलेली माहिती कोणत्याही प्रयोजनासाठी कार्यालयाच्या स्तरावर संकलित, वरिष्ठांना सादर अथवा तयार करण्यात आलेली नाही. त्यामुळे अशी माहिती कार्यालयीन अभिलेखाचा भाग नसल्यामुळे देता येणार नाही. तसेच घरभाडेसंदर्भात असे नमूद करण्यात येते की, वेतना व्यतिरिक्त कोणतेही घरभाडे शासनाकडुन दिले जात नसुन वेतनामध्येच घरभाडे भत्त्याची

रक्कम समाविष्ठ असते. त्यामुळे वेतनाबाबतची माहिती ही त्रयस्थपक्षाशी संबंधित असल्यामुळे व या माहितीमध्ये कोणतेही जनहित नसल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१४.१२.२०२३ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांचेसमोर जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे सादर केलेला युक्तिवाद प्रथम अपिलीय अधिकारी यांनी विचारात घेऊन अथवा त्याचे समर्थन करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांचे प्रथम अपील नामंजूर केलेले आहे. तसेच या प्रथम अपील निर्णयाव्दारे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना मुदतीत प्रतिसाद देणेविषयी निर्देश दिलेले आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती अधिकारात चुकीचा पत्रव्यवहार, असे कारण नमूद केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती व त्या अनुषंगाने उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर केलेला युक्तिवाद आणि अधिनियमातील तरतुदी या सर्व बाबींचा सारासार विचार करता, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.१४.१२.२०२३ रोजी पारित केलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसुन येत नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 8667 दिनांक :- 23/07/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक - २४६८ व ४०५३/२०२४ (०२)

श्री.रावण खंडु खैरे, — अपिलार्थी
रा.जुनोनी, ता.जि.धाराशिव

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, जुनोनी, ता.जि.धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, धाराशिव

(सुनावणी दिनांक १५.०७.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.२८.०३.२०२४ व दि.०८.०४.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्रीमती मोरे एस.एच. व प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं), श्री.ढाकणे एस.एस. उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दोन जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ४७ | २५.१०.२०२३ | ऑगस्ट महिना, ग्रामपंचायतने घेतलेली घंटा गाडीचे टेक्नीकल स्पेसिफिकेशन, गाडीची संपूर्ण माहिती, गाडी किती रकमेची आहे, गाडीचे वजन, ठराव, कॅशबुक अशी माहिती देण्यात यावी. |
| ४८ | २५.१०.२०२३ | १.ग्रामपंचायतीमध्ये १५ वित्त आयोग निधी, ग्रामनिधी, अन्य कोणता निधीमधुन मंजूर झालेली कामाची यादी, सदर कामासाठी झालेला खर्च याची माहिती,<br>२.मंजूर कामामध्ये पूर्ण झालेली कामाची यादी, प्रलंबित असणाऱ्या कामाची यादी, कोणती कामे रद्द झाली असल्यास त्याचा तपशिल, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जात व्यक्तिश: माहिती हवी असल्याचे नमूद केलेले आहे. तथापि व्यक्तिश: माहितीची मागणी करुन अपिलार्थी माहिती घेण्यासाठी कार्यालयात व्यक्तिश: उपस्थित राहिलेले नाहीत. म्हणून अपिलार्थी यांना भ्रमणध्वनीवरुन संपर्क केला असता अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिलेला नाही. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती ही संदिग्ध व विस्तृत स्वरुपाची आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१२.०२.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, सात दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. सदर प्रथम अपिलाच्या निर्णयास अनुसरुन दि.१६.०२.२०२४ रोजीच्या पत्राव्दारे, माहिती विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे ग्रामपंचायत कार्यालयात येऊन

माहितीचे अवलोकन करणेबाबत अपिलार्थी यांना टपालाव्दारे सुचित करण्यात आलेले आहे. तथापि अपिलार्थी यांनी सदर पत्राच्या अनुषंगाने अवलोकन करुन माहिती प्राप्त करुन घेणेबाबत प्रतिसाद दिलेला नाही. अपिलार्थी यांनी केवळ त्रास देण्याच्या उद्देशाने माहिती अर्ज केलेले आहेत. याउपर आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने कार्यवाही अनुसरण्यात येईल.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.१४.०२.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे. या निर्णयाव्दारे सात दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, मुदतीत माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे व्यक्तिश: माहितीची मागणी करुन माहिती प्राप्त करुन घेण्याबाबत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडे व्यक्तिश: संपर्क केला असल्याचे दिसुन येत नाही. तसेच जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपील निर्णयास अनुसरुन माहितीचे अवलोकन करणेबाबत अपिलार्थी यांना सुचित केले असता, सदर अवलोकनास्तव अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिलेला नाही. तसेच आज रोजी आयोगासमोरील सुनावणीकरिता अपिलार्थी अनुपस्थित आहेत. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांना माहिती प्राप्त करुन घेण्यामध्ये तसेच आयोगासमोरील सुनावणीमध्ये स्वारस्य असल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

उपरोक्त दोन अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 8668 दिनांक : 23/07/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक - ४४५२/२०२४**
**बोर्ड क्र.४९**

श्री.लक्ष्मण सोपान घोगरे,
रा.उपळे (मा), ता.जि.धाराशिव ... अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, उपळे (मा), ता.जि.धाराशिव ... : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, धाराशिव ... : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक १५.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२३.०४.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री.देवकते एस.डी. व प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं), श्री.ढाकणे एस.एस. उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १८.०१.२०२४ | गट विकास अधिकारी पंचायत समिती धाराशिव या कार्यालयाचे पत्र जा.क्र.पंचायत ३/काविं/२७६५/२०२३ दि.२२.११.२०२३ सबब याव्दारे आपणास सुचित करण्यात येते की या प्रकरणी संदर्भ ४ मध्ये नमूद केलेनुसार व महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मधील तरतुदीनुसार तात्काळ कार्यवाही करावी व तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा, गट विकास अधिकारी पंचायत समिती धाराशिव यांना काय कार्यवाही केलेली आहे त्या अहवालाची सत्यप्रत मिळणे, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती केलेल्या माहितीसंदर्भात प्रकरण दिवाणी दावा क्र.९६६/२०२१ अन्वये मा.न्यायालयासमोर न्यायप्रविष्ठ असल्यामुळे या प्रकरणातील कोणतीही माहिती देण्याबाबत ग्रामपंचायत कार्यालयास हस्तक्षेप करता येत नाही. त्यामुळे माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने अशी वस्तुस्थिती अपिलार्थीस दि.०७.०२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये अवगत करण्यात आलेली आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.१३.०३.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे. या निर्णयाव्दारे सात दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, अद्याप

कार्यवाही केली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीसंदर्भात प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्यामुळे माहिती देता येणार नाही. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती व त्या अनुषंगाने प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याची बाब आणि अधिनियमातील तरतुदी विचारात घेता, जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद योग्य ठरत आहे. मात्र प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित करताना माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती विचारात घेतली असल्याचे दिसुन येत नाही. सबब, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.१३.०३.२०२४ रोजी पारित केलेला निर्णय अधिक्रमित करुन आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 8669 दिनांक: 23/07/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक - ४४५४ व ४४५५/२०२४ (०२)

श्री.बालाजी युल्लुप्पा पारसे,
रा.कामेगाव, ता.जि.धाराशिव — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, कामेगाव, ता.जि.धाराशिव — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, धाराशिव — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक १५.०७.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.२३.०४.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री.सोकांडे डी.बी. व प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं), श्री.भांगे एल.ए. उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दोन जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ५० | ०६.०१.२०२४ | मौजे कामेगाव येथील जागाची फेर संचिका देण्याबद्दल, नावे राजाराम यल्लाप्पा हेगडे, संजय छत्रगुण भालेराव, इलाजाबाई कुबेर गुळीग, संजय अभिमन्यू कसबे--- या सगळयांच्या फेर संचिका देण्यात याव्या, |
| ५१ | ०५.०१.२०२४ | मौजे कामेगाव ता.जि.धाराशिव येथील ग्रा.पं. घर नं./मालमत्ता क्र.१०१, ७०, ७४, ७४/१ च्या फेरफार क्र. व ग्रामपंचायतीने सदर मालमत्ता क्रमांकाचे फेरफार मंजूर केलेल्या ठरावाच्या प्रती, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१४.०३.२०२४ रोजी सुनावणी घेऊन सात दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेशित केलेल आहे. सदर प्रथम अपिलाच्या निर्णयास अनुसरुन अपिलार्थी यांनी मागणी केलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी संपूर्ण माहिती अपिलार्थी यांना दि.२५.०४.२०२५ रोजीच्या पत्रान्वये उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती एकत्रित व संकलित करुन देणे अपेक्षित असल्यामुळे अशी माहिती देण्याकरिता काही विलंब झालेला आहे. अपिलार्थी यांना उपलब्ध करुन दिलेल्या माहितीशिवाय दुसरी कोणतीही माहिती कार्यालयात उपलब्ध नाही.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.१४.०३.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे. या निर्णयाव्दारे सात दिवसात माहिती

उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात आलेले आहे.

अपिलार्थी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडुन प्राप्त झालेली आहे. तथापि प्राप्त झालेली माहिती अपूर्ण असल्यामुळे परिपूर्ण माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न दिल्यामुळे / माहिती देण्यास टाळाटाळ, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अपूर्ण माहिती मिळाली असल्याबाबत मोघमपणे अवगत केलेले आहे. जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी सुनावणीदरम्यान युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

उपरोक्त दोन अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 8670 दिनांक : 23/07/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक - ७९१३/२०२४
बोर्ड क्र.५२

श्री.कोंडिबा तुळशीराम राऊत,
रा.ताकविकी, ता.जि.धाराशिव — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, ताकविकी, ता.जि.धाराशिव — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, धाराशिव — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक १५.०७.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.२३.०४.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री.उमेश धोंडीराम सरवदे व प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं), श्री.ढाकणे एस.एस. उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २७.०४.२०२४ | मौजे ताकविकी ता.जि.धाराशिव येथील ग्रामपंचायत हद्दीतील गायरान विस्तारवाढ यादी संपूर्ण कागदपत्रासह देण्यात यावी, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांचा माहिती अर्ज ग्रामपंचायतीच्या सरपंच यांच्याकडे सादर केला असुन सरपंच यांनी तशी अर्ज मिळाल्याबाबत पोच देखील दिलेली आहे. मात्र सदर माहितीचा अर्ज सरपंच यांच्याकडुन जन माहिती अधिकारी म्हणून कार्यवाही करण्याकरिता प्राप्त झाला नसल्यामुळे या अर्जाच्या अनुषंगाने कार्यवाही करता येणे शक्य झालेले नाही. आयोगाकडील सुनावणी नोटीस सोबत अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज कार्यालयास प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाबाबत ज्ञात झालेले आहे. त्यामुळे अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती एकत्रित / संकलित करुन आज रोजी अपिलार्थी यांना आयोगासमोर देण्याकरिता सोबत आणलेली आहे. सदर माहिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.०१.०८.२०२४ रोजी सुनावणी असल्याबाबत तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१८.०७.२०२४ रोजी सुनावणी नोटीस निर्गमित केली असल्याचे दिसुन येत आहे. तथापि सदर प्रथम अपिलावर सुनावणी होऊन निर्णय केला किंवा कसे याचा कोणताही बोध उपलब्ध संचिकेवरुन होत नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, कोणताच प्रतिसाद दिला नाही, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना देण्याकरिता सोबत आणलेली आहे. तथापि आज रोजी सुनावणीकरिता अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, ताकविकी, ता.जि.धाराशिव यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, धाराशिव यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 8671 दिनांक : 23/07/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक - १०७७५/२०२४
बोर्ड क्र.५३

श्री.चंद्रकांत रंगनाथ गरड,
रा.औरंगाबाद सोलापूर रोड, गणपती मंदीर, येडशी,
ता.जि.धाराशिव
: अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, येडशी, ता.जि.धाराशिव
: उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, धाराशिव
: उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक १५.०७.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.१३.१२.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री.जी.एम.भगत (वर्तमान) व श्री.पवार एस.आर. (तत्कालीन) व प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं), श्री.ढाकणे एस.एस. उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र 'अ' नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०८.०७.२०२४ | ग्रामपंचायत मिळकत क्र.१४०३/१ चा सन २००४-०५ ते २०२३-२४ या कालावधीत श्री.सुर्यकांत रंगनाथ गरड यांनी ग्रा.पं. कर भरलेल्या पावत्यांचा छायाप्रती अथवा पावत्याची अ.क्र. पावत्याची रक्कम इ. पूर्ण तपशिल, प्रत्येक आर्थिक वर्षाचा वेगवेगळा तपशिल रोकड वहीनुसार लेखी स्वरुपात. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली माहिती अद्याप मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीचा कालावधी मोठा असल्यामुळे अशी माहिती एकत्रित / संकलित करण्याकरिता काही कालावधी लागलेला आहे. सदर एकत्रित / संकलित केलेली माहिती आज रोजी अपिलार्थी यांना आयोगासमोर उपलब्ध करुन देण्याकरिता सोबत आणलेली असुन या माहितीशिवाय दुसरी माहिती कार्यालयात उपलब्ध नाही. सदर माहिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देण्यात येईल.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२४.०९.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे. या निर्णयाव्दारे सात दिवसात माहिती

उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिलेली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना देण्याकरिता सोबत आणलेली आहे. आयोगाच्या निर्देशानुसार सदर माहिती अपिलार्थी यांना देण्यात आली. अपिलार्थी यांनी सदर माहिती आयोगासमोर स्विकारलेली आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्रशाइ

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 8672 दिनांक : 23/07/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक - २७५० व २७५१/२०२३ (०२)**

श्री.लक्ष्मण अमृतराव हिरे,
रा.महात्मा फुले नगर, भोकर, ता.भोकर, जि.नांदेड — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
कार्यालय अधीक्षक,
नगर परिषद, भोकर, जि.नांदेड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, भोकर, जि.नांदेड — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक १५.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२४.०४.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दोन जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ५४ | ०२.०२.२०२३ | सन २००० पासुन भोकर नगर परिषदेला शासनाकडुन कोणकोणता विकास कामाचा निधी प्राप्त झाला, केलेल्या कामाची संपूर्ण माहिती आदेशाच्या संपूर्ण सत्यप्रती मिळणे, |
| ५५ | ०२.०२.२०२३ | सन २००० ते २०२२ या काळात भोकर नगर परिषद क्षेत्रात स्वच्छता राबविण्यासाठी घनकचरा व्यवस्थापनातर्गत एजन्सीला देण्यात आलेल्या कामाचे आदेश, करार पत्रक, एजन्सीत काम करणाऱ्या सफाई कामगाराची यादी, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्यापपर्यंत उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता टाळाटाळ केलेली आहे. सदर मागणी केलेल्या माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अद्याप माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत, व्यापक व मोघम स्वरुपाची आहे. अशी माहिती एकत्रित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते, ही बाब माहिती अधिकारी

अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

उपरोक्त दोन अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 8673 दिनांक : 22/07/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक - ४४९१ व ४४९२/२०२३ (०२)

श्री.गुलाम अली शाह सय्यद,
रा.हनुमान चौक, मुर्तुजा वली दरगाह, देगलूर,
ता.देगलूर, जि.नांदेड — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
कर अधिकारी,
नगर परिषद, देगलूर, जि.नांदेड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, देगलूर, जि.नांदेड — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक १५.०७.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.१०.०७.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व अपिलार्थी यांचे प्रतिनिधी, श्री.सुरेश देगलूरकर, जन माहिती अधिकारी तथा कर अधिकारी, श्री.अक्षय संयज पल्लेवाड, प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री.लालू मुष्णाजी सोनकांबळे, कार्यालय अधीक्षक उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दोन जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ५६ | ०३.०३.२०२३ | सन १९५५ ते २०२३, अलंकार बार, मोंढा रोड, बरडे कॉम्प्लेक्स जवळ, देगलूर या जागेच्या मुळ मालक ते आतापर्यंतच्या मालकांची माहिती पाच मुद्यांवर मिळणेबाबत, |
| ५७ | ०३.०३.२०२३ | सन १९५५ ते २०२३, अलंकार बार, मोंढा रोड, बरडे कॉम्प्लेक्स जवळ, देगलूर या जागेच्या मुळ मालक ते आतापर्यंतच्या मालकांची माहिती पाच मुद्यांवर मिळणेबाबत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्यापपर्यंत उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता टाळाटाळ केलेली आहे. सदर मागणी केलेल्या माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या आज रोजी आयोगासमोर प्रस्तावित असलेल्या दोनही व्दितीय अपिलातील माहितीचा अर्ज एक सारखाच आहे. अपिलार्थी यांनी एका माहिती अर्जाबाबत दोन व्दितीय अपील दाखल केले असल्याचे समजून येते. अपिलार्थी यांनी माहितीची मागणी करताना ती अत्यंत मोघमपणे केलेली आहे. सदर माहितीचा कालावधी खुप मोठा असुन सदर माहिती विस्तृत स्वरुपाची आहे. अपिलार्थी यांनी नेमका मालमत्ता क्रमांक नमूद करुन माहितीची मागणी केली असती तर ती उपलब्ध

करुन देता येणे शक्य झाले असते. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास दि.०५.०४.२०२३ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन, माहिती अर्जात कोणत्या मालमत्ताची माहिती पाहिजे त्या मालमत्ता क्रमांकाचा उल्लेख केलेला नसल्यामुळे हव्या असलेल्या माहितीचा स्पष्ट उल्लेख करुन अर्ज सादर केल्यास हवी असलेली माहिती देण्यात येईल, असे अपिलार्थी यांना कळविण्यात आलेले आहे. तथापि अपिलार्थी यांना सुचित केल्याप्रमाणे त्यांनी कार्यवाही करुन माहिती प्राप्त करुन घेण्याऐवजी प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रथम अपील दाखल केलेले आहे. सदर प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१४.०६.२०२३ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या प्रतिसादाचे समर्थन करुन अपिलार्थी यांचे प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती प्राप्त न झाल्याबाबत, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांचे प्रतिनिधी यांनी अद्याप माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती व प्रथम अपील अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती अवगत केली असल्याचे दिसुन येत आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती, त्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद व अधिनियमातील तरतुदी या सर्व बाबींचा सारासार विचार करता, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.१४.०६.२०२३ रोजी पारित केलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसुन येत नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

उपरोक्त दोन अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 8674 दिनांक : 23/07/2023

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये ०७ द्वितीय अपील दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री.रमेश सावंत, लिपिक उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या ०७ जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ७३ | ०१.१२.२०२२ | राज्य माहिती आयोग औरंगाबाद अपील क्र.१२४/२०१९ वरील निर्णयानुसार केलेल्या कारवाईची माहिती, |
| ७४ | ०१.०२.२०२३ | राज्य माहिती आयोग औरंगाबाद अपील क्र.५९८/२०१९ वरील निर्णयानुसार केलेल्या कारवाईची माहिती, |
| ७५ | २३.०१.२०२३ | विभागीय आयुक्त कार्यालय औरंगाबाद यांचे पत्र जा.क्र.२०२२/न.पा.प्र./संकीर्ण/कावि - १५५१ या पत्राव्दारे आपणास माहितीस्तव देण्यास सांगितले असता आपण मला माहिती दिली नसुन कार्यालयास आपण तपास करुन काय माहिती दिली या विषयी माहितीची सत्यप्रत, |
| ७६ | ०३.०३.२०२३ | राज्य माहिती आयोग औरंगाबाद अपील क्र.२१०३/२०२० वरील निर्णयानुसार तलाठी सजाकडील ०३ प्रती मिळाल्या असुन ०१ प्रत आपल्या न.पा.ची असल्याने ती मिळावी, |

| | | |
|---|---|---|
| ७७ | १६.०२.२०२३ | राज्य माहिती आयोग औरंगाबाद अपील क्र.५९८/२०१९ वरील निर्णयानुसार केलेल्या कारवाईची माहिती, |
| ७८ | २०.०३.२०२३ | तहसिल कार्यालय मुदखेड यांचेकडील खंडपीठ आदेश आल्यावर आपणास जे पत्र दिलेले आहे त्या पत्राविषयी माहिती, |
| ७९ | २०.०३.२०२३ | तहसिल कार्यालय मुदखेड यांचेकडील खंडपीठ आदेश आल्यावर आपणास जे पत्र दिलेले आहे त्या पत्राविषयी माहिती, |

२. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी हे वारंवार मोठ्या प्रमाणात माहितीचे अर्ज सादर करुन नाहकपणे एकाच विषयाची संबंधित माहिती मागवत असतात. अपिलार्थी यांचे नामदेव शेषप्पा पबितवार यांच्या घरासमोर स्टेशनरी दुकान आहे. सदर जागा ही मुदखेड येथील गट क्र.५६५ पैकी जागेतील असुन श्री.पबितवार यांनी सदर जागा सन १९७६ पूर्वी खरेदी केलेली ही जागा शासकीय असल्याचे घोषित करुन ती जागा रिक्त करुन सदर जागा अपिलार्थी यांना मिळुन द्यावी, अशी अपिलार्थी यांची प्रमुख मागणी आहे. सदर मागणी पूर्ण होत नसल्याच्या सबंबीवरुन अपिलार्थी वारंवार निरनिराळ्या प्राधिकरणाकडे अर्ज फाटे करत आहेत. अपिलार्थी वारंवार प्रधान सचिव (नगर विकास विभाग), सीएमओ, डीएमओ, विभागीय आयुक्त कार्यालय, जिल्हाधिकारी कार्याल्य, उपविभागीय अधिकारी कार्यालय, तहसिल कार्यालय, नगर परिषद कार्यालयाकडे अर्ज करत आहेत. अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिली तरी त्यांचे समाधान होत नाही. कारण त्यांना जशी माहिती पाहिजे तशी माहिती देता येणे शक्य नाही. अपिलार्थी एखाद्या वेळेस नगर परिषद कार्यालयात आले आणि त्यावेळेस जर मुख्याधिकारी किंवा इतर अधिकारी / कर्मचारी जागेवर नसेल तर ते लगेच माहिती अधिकारातंर्गत अर्ज देऊन मागणी करतात. कार्यालयात उपस्थित राहण्याची वेळ, कोणत्या कामासाठी गेले ....इ., अपिलार्थी यांनी आयोगाकडे देखील खुप अपिले दाखल केलेली आहेत. अपिलार्थी यांच्या जेवढ्या व्दितीय अपिलांवर आयोगाकडुन निर्णय पारित झालेले आहेत जवळजवळ तेवढ्याच निर्णयाबाबत अपिलार्थी यांनी कार्यालयाकडे परत माहितीचे अर्ज देऊन आयोगाकडील निर्णयाप्रमाणे काय कार्यवाही केली अशी माहिती मागितलेली आहे. अपिलार्थी त्यांच्या सवयीप्रमाणे परत परत माहिती अर्ज सादर करतात. अपिलार्थी यांनी २०२३-२४ पासुन जवळजवळ ३० माहितीचे अर्ज व तेवढेच प्रथम अपील कार्यालयाकडे सादर केलेले आहेत. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जांची संख्या लक्षात घेता त्यांच्याकडुन प्रशासनास वेठीस धरण्याचा प्रयत्न केला जात आहे. अपिलार्थी यांच्या अशा वारंवार मोठ्या प्रमाणावर अर्ज करण्याच्या भूमिकेचा विपरित परिणाम दैनंदिन शासकीय कामकाजावर होऊन नियमित शासकीय कामे प्रलंबित राहुन गरजू नागरिकांना नैसर्गिक न्याय देता येणे शक्य होत नाही.

३. माहिती अधिकार कायद्यामध्ये माहिती मागण्याबाबत कुठल्याही प्रकारचा प्रतिबंध नसला तरी माहितीचा मूळ उद्देश हा आहे की, शासकीय कामात पारदर्शकता आणून जनतेला माहिती मिळावी आणि शासकीय कामात कार्य तत्परता असावी असा आहे. वारंवार माहिती अर्ज केल्याने शासकीय कामात अडथळा निर्माण होऊन शासकीय कामकाजावर त्याचा विपरीत परिणाम होतो व अशा प्रकारची माहिती जमा करण्यासाठी शासकीय यंत्रणेच्या वेळेचा अपव्यय होतो.

एकाच व्यक्तीने मोठ्या संख्येने माहिती अधिकार कायद्याखाली माहिती अर्ज / अपिले करणे माहिती अधिकार कायद्यामध्ये अभिप्रेत / अपेक्षित नाही. यावरुन अपिलार्थी हे माहिती अधिकार कायद्याचा दुरुपयोग करुन संबंधित शासकीय कार्यालयास / प्राधिकरणास वेठीस धरत असुन त्यांच्या या कृतीमुळे संबंधित शासकीय कार्यालयाचे / प्राधिकरणांचे दैनंदिन कामकाज ठप्प होण्याचा गंभीर धोका निर्माण झाला आहे. अशा मोठ्या स्वरुपात अर्ज करण्याच्या सवयीमुळे संबंधित शासकीय कार्यालये / प्राधिकरणे यांचा बहुमुल्य वेळ व शक्ती अधिक प्रमाणात खर्ची पडुन सदर शासकीय कार्यालयांकडुन सर्व सामान्य जनतेला ज्या सेवा देणे अभिप्रेत आहे त्या महत्वाच्या शासकीय कामकाजावर गंभीर परिणाम होण्याचा धोका देखील निर्माण झालेला आहे.

४. प्रस्तुत प्रकरणाच्या अनुषंगाने, मा.सर्वोच्च न्यायालयाने, सिव्हील अपील ६४५४/२०११, दिनांक ०९.०८.२०११ रोजी या प्रकरणी Appealicants Central Board of Secondary Education & Anr. Vs Aditya Bandopadhyay & Ors. Respondents या प्रकरणी दिलेल्या निर्णयामध्ये, माहिती अधिकाराचा योग्य वापर

होणेबाबत लक्ष वेधले असुन या निर्णयामध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने खालील आदेश दिले आहेत.

"The Act should not be allowed to misused or abused, or to become a tool to abstract the national development and integration, or to destroy the peace, tranquility and harmony among its citizens. Nor should it be converted into a tool of oppression or intimidation of honest officials striving to the tot do their duty-Nation does not want a scenarios where ७५ % of the staff of public authorities spend ७५ % of their time in collecting and furnishing information to applicants instead of discharging their regular duties. The threat of penalties under the RTI Act and pressure of the authorities under the Act should not lead to employees of a public authorities prioritizing information furnishing, at the cost of their normal and regular duties."

तसेच शासकीय कामकाजावर विपरीत परिणाम होतो व अशा प्रकारची माहिती जमा करण्यासाठी शासकीय यंत्रणेचा वेळेचा अपव्यय होतो. त्यानुसार प्रस्तुत कायद्याचा मुख्य उद्देश कामकाजात पारदर्शकता, सामान्य जनतेला / नागरीकांना माहिती मिळावी आणि जनतेने माहिती जाणून घेऊन शासकीय कामकाज कार्यक्षम होणे व त्यात समन्वय प्रस्थापित होणे हा आहे. जर अशाप्रकारे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ या कायद्याचा दुरुपयोग झाल्यास निश्चितपणे शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना मुख्य कार्यालयीन कामकाज सोडुन प्राप्त माहिती अर्जावर अधिनियमाप्रमाणे कामकाज करावे लागेल. त्यामुळे शासकीय यंत्रणेच्या वेळेचा अपव्यय होऊन त्याचा विपरीत परिणाम शासकीय कामकाजावर होईल.

५. यावरुन माहिती अधिकार कायद्यातंर्गत पुन्हा पुन्हा माहितीची मागणी केल्याने जन माहिती अधिकारी अपिलाशी संबंधित कर्मचारी, सार्वजनिक प्राधिकरण, प्रथम अपिलीय अधिकारी यांना त्यांचा मौल्यवान वेळ इतर शासकीय कामकाज करण्यासाठी देणे शक्य होत नाही. तसेच पुन्हा तोच विषय व्दितीय अपिलापर्यंत आल्यास माहिती आयोगाला क्रमवारीनुसार प्राप्त झालेल्या इतर व्दितीय अपिलांच्या सुनावणीसाठी वेळ देणे शक्य होत नाही.

उपरोक्त सर्व बाबी तसेच मा.सर्वोच्च न्यायालयाकडील निर्णय विचारात घेता, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये मागणी केलेल्या माहितीतून कोणतेही व्यापक जनहित साध्य होत असल्याचे स्पष्ट होत नाही. वारंवार मोठ्या प्रमाणात माहितीचे अर्ज करुन मागणी केलेल्या माहितीच्या मागणीमुळे शासकीय यंत्रणेतील मनुष्यबळ व साधन, सामग्री यावर ताण येऊन सर्वसामान्य नागरिकांच्या दैनंदिन शासकीय कामे पूर्ण करण्याच्या शासकीय कार्यालयाच्या / प्राधिकरणाच्या क्षमतेवर विपरित परिणाम होऊन शासकीय कामकाजाचा खोळंबा होईल व असे माहिती अधिकार कायद्यास अभिप्रेत नाही, असे आयोगाचे स्पष्ट मत झालेले आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. अपिलार्थी यांची उपरोक्त ०७ व्दितीय अपिले फेटाळण्यात येत आहेत.
२. मुख्याधिकारी, नगर परिषद, मुदखेड, जि.नांदेड यांना असे निर्देशित करण्यात येते की, प्रस्तुत आदेशाची जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा नांदेड यांचेमार्फत व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी. तसेच सदर आदेश आपल्या अधिनस्त कार्यालयातील सुचना फलकावर लावून आपल्या स्तरावरुन सुध्दा व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 8616 दिनांक : 22/07/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक - १२१२/२०२३**
**बोर्ड क्र.८०**

श्री.पंडित दौलतराव तिडके,
रा.श्रीकृष्ण निवास, प्रभाग क्र.०७, शंकर नगर, सेनगाव,
ता.सेनगाव, जि.हिंगोली — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
उपकार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड, महात्मा फुले शाळा रस्ता,
स्नेहनगर, नांदेड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड, महात्मा फुले शाळा रस्ता,
स्नेहनगर, नांदेड — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक-१५.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१६.०२.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा प्रथम लिपिक, श्री.के.व्ही.वावरे व प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, श्री.ओ.जी.काळे उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १२.०९.२०२२ | हिंगोली ते रिसोड, येलदरी ते नाका कनेरगाव या रोडचे काम केलेल्या कंत्राटदाराने करार केलेला करारनामा सहीत नियम, अटी व शर्ती लागू असलेली सत्यप्रत व एकुण रोडवरील इस्टीमेटची प्रत, एकुण मंजूर निधी पैकी खर्च झालेला निधी, शिल्लक निधी, सदरील रोडचे काम किती झाले, किती करणे बाबी आहे हा अहवाल, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध नाही. अपिलार्थी यांनी त्यांचा मूळ माहितीचा अर्ज सार्वजनिक बांधकाम विभाग, हिंगोली यांच्या कार्यालयाकडे सादर केलेला असुन सदर माहिती अर्ज दि.२०.०९.२०२३ रोजीच्या पत्रासोबत हिंगोली कार्यालयाकडुन नांदेड कार्यालयास वर्ग करण्यात आलेला आहे. अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती व माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे अपिलार्थी यांना वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने उपलब्ध करुन देण्यात येईल.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर

तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.०८.१२.२०२२ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, जी माहिती कार्यालयात उपलब्ध आहे ती माहिती १५ दिवसात उपलब्ध करुन देण्याचे आणि जी माहिती कार्यालयात उपलब्ध नाही त्याबाबत अपिलार्थीस कळविण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी अपिलार्थीस माहिती व वस्तुस्थिती उपलब्ध करुन देतील, ही बाब प्रथम अपिलीय अधिकारी या नात्याने व्यक्तिश: पाहण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न दिल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. तथापि सदर प्रथम अपील निर्णयाची अंमलबजावणी झाली असल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा प्रथम लिपिक, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 8618 दिनांक :- 22/07/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक - १२७८/२०२३**
**बोर्ड क्र.८१**

श्री.सय्यद बिलाल स. अफसर,
रा.गल्ली नं.१०, पिरबुऱ्हाण नगर, नांदेड — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
प्रथम लिपिक,
सार्वजनिक बांधकाम विभाग, स्नेहनगर, नांदेड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपकार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, स्नेहनगर, नांदेड — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक १५.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२१.०२.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा प्रथम लिपिक, श्री.के.व्ही.वावरे व प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, श्री.ओ.जी.काळे उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०१.११.२०२२ | आपले कार्यालयात वर्ग-१ ते ४ पर्यंतचे सर्व कर्मचारी आपल्या कार्यालयात केव्हापासुन कार्यरत आहेत त्याची संपूर्ण खातेनिहाय माहिती जसे केव्हा कामावर रुजू झाले त्या तारखेपासुन आजपर्यंत संपूर्ण माहिती नावासह. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिली किंवा कसे याचा कोणताही बोध उपलब्ध संचिकेवरुन होत नाही. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती मोघम व विस्तृत स्वरुपाची असुन ती त्रयस्थपक्षाशी संबंधित आहे. याबाबत आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने कार्यवाही करण्यात येईल.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी कार्यवाही करतील ही बाब प्रथम अपिलीय अधिकारी या नात्याने व्यक्तिश: पाहण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिलेली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती

मोघम स्वरुपाची आहे. अशी माहिती एकत्रित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते, ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाहीत.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.- 8618 दिनांक : 22/07/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक - १३१७/२०२३**
**बोर्ड क्र.८२**

श्री.मधुकर कांबळे सलगरकर,
रा.सोनाई निवास, राहुलनगर, वाघाळा, ता.जि.नांदेड — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
उपकार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, देगलूर, जि.नांदेड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, देगलूर, जि.नांदेड — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक १५.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२३.०२.२०२३ रोजी, राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, श्री.व्हि.डी.गाडेकर उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १०.०८.२०२२ | सन २०१९ ते आजतागायत पर्यंत उपविभागनिहाय मंजुरी दिलेल्या कामाचे कार्यारंभ आदेश पत्राच्या छायांकित प्रती साक्षांकित करुन देणेबाबत. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती कार्यालयाच्या अधिनस्त निविदा शाखेशी संबंधित असल्यामुळे दि.१४.०९.२०२२ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्याच्या दृष्टीकोनातून संबंधित निविदा शाखेचे सहाय्य घेण्यात आलेले आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२९.११.२०२२ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, आठ दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे निविदा शाखेस आदेशित केलेले आहे. सदर निर्णयानुसार दि.०१.०३.२०२३ रोजीच्या पत्रान्वये निविदा शाखेकडुन पुन:श्च माहितीची मागणी करण्यात आलेली आहे. निविदा शाखेकडुन माहिती वेळेत प्राप्त झाली नसल्यामुळे अशी माहिती अपिलार्थीस देता आलेली नाही. तथापि आज रोजीच्या आयोगासमोरील सुनावणीच्या अनुषंगाने अपिलार्थीस आवश्यक असलेली व निविदा शाखेकडे उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती एकत्रित / संकलित करुन अपिलार्थी यांना आयोगसमोर उपलब्ध करुन देण्याकरिता सोबत आणलेली आहे. आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे सदर माहिती अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती

दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना देण्याकरिता आज रोजी सोबत आणलेली आहे. तथापि आज रोजी सुनावणीकरिता अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, देगलूर, जि.नांदेड यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, देगलूर, जि.नांदेड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 8619 दिनांक : 22/07/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक - १४०८ व १४०९/२०२३ (०२)**
**बोर्ड क्र.८३ व ८४**

श्री.अनुप श्रीराम आगाशे, — अपिलार्थी
रा.मयुर अपार्टमेंट, प्लॉट नं.४, कैलास नगर, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
प्रथम लिपिक,
सार्वजनिक बांधकाम विभाग, स्नेहनगर, नांदेड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उपकार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, स्नेहनगर, नांदेड

**(सुनावणी दिनांक १५.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२७.०२.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा प्रथम लिपिक, श्री.के.व्ही.वावरे व प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, श्री.ओ.जी.काळे उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ८३ | १५.०६.२०२२ | नांदेड शहरात खालील कामाचे भुमिपुजन केले आहे, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, महावीर चौक, बर्की चौक, महाराणा प्रताप चौक सिडको, छावा चौक कोठा येथे भुमि पुजन करण्यात आले, लातुर फाटा (डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक) ते ढवळे कॉर्नर व महाराणा प्रताप चौक सिडको ते हडको पाण्याची टाकी, उस्माननगर रोड लिंक रस्त्याचे सी.सी.रस्ते व नाली वसरणी येथे सीसी रस्ते व नाली बांधकाम दुभाजकासह संगम स्थळाची सुधारणा करणे, रेल्वेस्टेशन ते छत्रपती शिवाजी महाराज पुतळा मुथा चौक महावरी चौक गुरुव्दारा चौक (देनाबँक चौक) जुना मोंढा बर्की चौक पहेलवान टी हाऊस देगलूर नाका येथे सीसी रस्ते व नाली बांधकाम दुभाजकासह संगम स्थळाची सुधारणा करणे, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा महात्मा गांधी पुतळा फॉरेस्ट ऑफिस चौक गुरुव्दारा गेट नंबर १ ते रणजीतसिंह मार्के (स.भगतसिंग चौक) केळी मार्केट चौक कब्रस्तानच्या घर बाजुने उर्दू घरापर्यंत सीसी रस्ते व नाली बांधकाम दुभाजकासह संगम स्थळाची सुधारणा करणे, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक हिंगोली गेट आरोबी यात्री निवास पोलीस चौकी फॉरेस्ट ऑफिस ते महावरी चौक मल्टीपर्पज हायस्कूल ते बंदाघाट लिंक सीसी रस्ते व नाली बांधकाम |

| | | |
|---|---|---|
| | | दुभाजकासह संगम स्थळाची सुधारणा करणे या कामाचा विकास कामाचे सर्व यांचे इस्टीमेट, वर्क ऑर्डर, साईड प्लॅन व इतर कागदपत्रे, |
| ८४ | ०९.०५.२०२२ | नांदेड जिल्हातील सार्वजनिक बांधकाम विभागाचे रेस्ट हाऊस, हॉटेल कोणाला टेंडर दिले त्या बद्दलची सर्व कागदपत्रे, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिली किंवा कसे याचा कोणताही बोध उपलब्ध संचिकेवरुन होत नाही. तथापि अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.१४.०९.२०२२ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे. या निर्णयाव्दारे माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात आलेले आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी उपलब्ध करुन देतील, ही बाब प्रथम अपिलीय अधिकारी या नात्याने व्यक्तिशः पाहण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा प्रथम लिपिक, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली प्रति माहिती अर्ज ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना प्रति माहिती अर्ज ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात येईल.

२. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह दोन व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 8614 दिनांक : 22/07/2025

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक - २०३३/२०२३
बोर्ड क्र.८५

श्री.रामनारायण मयारामजी बंग, — अपिलार्थी
रा.घर न.१६, नारायणी, मेन रोड, यशवंतनगर, नांदेड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
प्रथम लिपिक,
सार्वजनिक बांधकाम विभाग, स्नेहनगर, नांदेड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, स्नेहनगर, नांदेड

(सुनावणी दिनांक १५.०७.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.२३.०४.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये व्दितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा प्रथम लिपिक, श्री.के.व्ही.वावरे व प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, श्री.ओ.जी.काळे उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १६.१२.२०२२ | नांदेड वाघाळा महानगरपालिकेतुन आपल्याकडे वर्ग झालेल्या रस्त्याची संख्या, त्या सर्व रस्त्याची नावे, लांबी रुंदी माहिती, वर्ग झालेल्या रस्त्यापैकी प्रगतीपथावर असलेल्या कामाच्या (सीसी रोड / डांबर रोड) माहिती, मोजणी पुस्तकाची प्रत, स्केचची प्रत, अंदाजाच्या तपशिलाची प्रत, कंत्राटात हमी खंडाची व त्याच्या शर्तीची तरतुद असलेल्या दस्तऐवजाची प्रत, कार्यादेशाची प्रत, काम सुरु केल्याची व काम पूर्ण केल्याची तारीख, मुदतीच्या आत काम पूर्ण झाले नसल्यास त्याची सविस्तर माहिती, कामासाठी प्रदान केलेली रक्कम व त्याचे देयक, रस्त्याच्या कामाशी संबंधित असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांचे पदनामासह नाव, काम सुरु असलेल्या रस्त्यावर सर्व सामान्य नागरिकांना माहिती होण्यासाठी लावलेल्या नाम फलकाची माहिती, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती मोघम स्वरुपाची असुन माहितीचे स्वरुप विस्तृत आहे. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास प्रतिसाद देऊन एका कामाची माहिती देय होत असल्यामुळे नेमक्या कोणत्या कामाची माहिती हवी आहे त्या कामाचे नाव कार्यालयास कळवावे जेणेकरुन माहिती उपलब्ध करुन देता येणे शक्य होईल, असे अपिलार्थी यांना कळविण्यात आलेले आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी उपलब्ध करुन देतील ही बाब प्रथम अपिलीय अधिकारी या नात्याने व्यक्तिश: पाहण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा प्रथम लिपिक, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 9389 दिनांक : 08/08/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

व्दितीय अपील क्रमांक - २१२०/२०२३
बोर्ड क्र.८६

श्री.विवेक अरविंद कोमावार,
रा.उमरी बाजार, ता.किनवट, जि.नांदेड — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
सहायक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, किनवट / माहुर, जि.नांदेड — : उत्तरवादी क्र.१

सहायक जन माहिती अधिकारी तथा
आरेखक,
सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर, जि.नांदेड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर, जि.नांदेड — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक १५.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२७.०३.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये व्दितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, सहायक जन माहिती अधिकारी तथा आरेखक, श्री.साईनाथ वैजनाथ पोटजाळे उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ३१.१०.२०२२ | १. सारखणी ते मांडवी हा रस्ता कोणत्या वर्षी निर्माण झाला,<br>२.हा रस्ता बनवण्यासाठी कधी आणि कोणा कोणाकडुन किती किती फुट जागा अधिग्रहित केली, याची संपूर्ण माहिती,<br>३.ज्या ज्या लोकांकडुन जागा अधिग्रहित केली त्या लोकांना त्याचा मोबदला किती किती दिला आणि कधी दिला,<br>४. ज्या ज्या लोकांना मोबदला दिला त्या लोकांची माहिती, ज्या लोकांनी दान पत्र दिले त्या लोकांचे दानपत्राच्या साक्षांकित प्रत आणि रस्ता बनवण्यासाठी जमीन अधिग्रहण करताना झालेल्या सगळ्या प्रक्रियेची संपूर्ण माहिती, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती

अद्याप मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

सहायक जन माहिती अधिकारी तथा आरेखक यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांचा माहिती व प्रथम अपिलाचा अर्ज ऑनलाईन पध्दतीने सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे सादर केलेला आहे. सदर अर्ज सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडुन सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर या कार्यालयाकडे आवश्यक कार्यवाहीकरिता हस्तांतरित करण्यात आलेले आहेत. सदर हस्तांतरित करण्यात आलेला माहितीचा अर्ज सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर कार्यालयाकडुन जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता श्रेणी-१, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, किनवट यांचेकडे दि.०८.१२.२०२२ रोजीच्या पत्रान्वये हस्तांतरित करण्यात आलेला आहे. तसेच अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर, जि.नांदेड यांनी दि.२४.०१.२०२३ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, अभिलेखात उपलब्ध असलेली माहिती ३० दिवसात उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, किनवट / माहुर यांना व सहायक जन माहिती अधिकारी तथा आरेखक यांना आदेशित केलेले आहे. तथापि सदर प्रथम अपिलाच्या निर्णयानुसार अपिलार्थीस माहिती दिली किंवा कसे याचा कोणताही बोध उपलब्ध संचिकेवरुन होत नाही. तथापि अपिलार्थी यांना माहिती अर्जाव्दारे हवी असलेली माहिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न दिल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, या प्रकरणी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. तथापि सदर प्रथम अपील निर्णयाची अंमलबजावणी झाली असल्याचे दिसुन येत नाही. या प्रकरणी अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली माहिती अपिलार्थी यांना सत्वर प्राप्त व्हावी या दृष्टीकोनातून अधिनियमातील कलम १९ (८) (क) (दोन) नुसार उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर, जि.नांदेड यांना आयोगातर्फे जन माहिती अधिकारी म्हणून निश्चित करण्यात येत आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. आयोगातर्फे निश्चित जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर, जि.नांदेड यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.
२. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर, जि.नांदेड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.
३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 9390 दिनांक : 07/08/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक - २३५४/२०२३
बोर्ड क्र.८७

श्री.योगेश गणपतराव जाकरे,
रा.देशपांडे गल्ली, जामा मस्जिदजवळ, देगलूर,
ता.देगलूर, जि.नांदेड — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
उपकार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, देगलूर, जि.नांदेड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, देगलूर, जि.नांदेड — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक १५.०७.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.१०.०४.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, श्री.व्ही.डी.गाडेकर उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २८.१२.२०२२ | १.देगलूर ते नरसी रस्त्यावरील वन्नाळी येथे रस्त्यावर टोलनाका तसेच टोल आकारणी सुरु करताना रहदारीचा (Vehicle Flow) अभ्यास केला आहे काय, असल्यास केव्हा केला, सदर रहदारी अभ्यास / रहदारी सर्वेक्षण अभ्यास अहवालाची एक सत्यप्रत द्यावी, हा अहवाल कोणत्या सक्षम अधिकाऱ्यांनी केला त्यांचे पदनाम व हुद्दा द्यावा,<br>२. टोलचे दर काय आहेत, प्रत्येक प्रकाराच्या वाहनागणीक तपशिल द्यावा, तसेच हे दर ठरविताना काय वस्तुस्थिती विचारात घेतली आणि हे दर कोणत्या आधारावर घेतले, त्या संबंधीचे कागदपत्रे उपलब्ध करुन द्यावीत,<br>३. या टोल आकारणी संदर्भात जी टेंडर नोटीस प्रसिध्द करण्यात आली तसेच कोटेशनच्या आलेल्या निविदाच्या प्रती तसेच तुलनात्मक तक्ता द्यावा,<br>४. टोलचा ठेका देताना काढलेल्या वर्ग ऑर्डरची प्रत द्यावी,<br>५. टोल कधी सुरु झाला, टोल आकारणी दरात किती वेळा व किती रुपयाचा बदल झाला, सुरु झाल्यापासुन आजपर्यंत किती रुपये वसुल झाले, किती रुपये वसुल होणे अपेक्षित आहेत, टोल किती कालावधीच्या मुदतीपर्यंत सुरु ठेवण्याचे ठरले आहे, केव्हा वसुली बंद कधी होणार याची तारीख किंवा कालावधी ठरला आहे काय, असल्यास तपशिल द्यावा, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती सार्वजनिक बांधकाम उपविभाग नायगाव या कार्यालयाशी संबंधित असल्यामुळे अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज दि.०४.०१.२०२३ रोजीच्या पत्रासोबत सार्वजनिक बांधकाम उपविभाग नायगाव कार्यालयाकडे वर्ग करण्यात आलेला आहे. तसेच दि.१७.०१.२०२३ रोजीच्या पत्राव्दारे माहिती उपलब्ध करुन देण्याचे सार्वजनिक बांधकाम उपविभाग नायगाव यांना सुचित करण्यात आलेले आहे. संबंधित जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता श्रेणी-२, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, नायगाव, जि.नांदेड यांनी त्यांच्या दि.१३.०२.२०२३ रोजीच्या पत्रान्वये, मागणी केलेली माहिती संकेतस्थळावर उपलब्ध असल्याचे संकेतस्थळाच्या पत्त्यासह अपिलार्थी यांना कळविलेले आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.०९.०३.२०२३ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, दि.१३.०२.२०२३ रोजीचे पत्र अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता श्रेणी-२ यांना निर्देशित करुन अपिलार्थी यांचे प्रथम अपील निकाली काढलेले आहे

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न दिल्याने, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता श्रेणी-२, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, नायगाव, जि.नांदेड यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास प्रतिसाद देऊन माहिती संकेतस्थळावर उपलब्ध असल्याचे दि.१३.०२.२०२३ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस कळविलेले आहे. तथापि सदर पत्र अपिलार्थीस अप्राप्त असल्यामुळे सदर पत्र अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना निर्देशित करुन अपिलार्थी यांचे प्रथम अपील प्रथम अपिलीय अधिकारी यांनी निकाली काढलेले आहे. आज रोजी सुनावणीकरिता अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील निर्णयाव्दारे निर्देशित केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी दि.१३.०२.२०२३ रोजीचे पत्र अपिलार्थीस उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत नाही. म्हणून वर्तमान जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता श्रेणी-२, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, नायगाव, जि.नांदेड यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, दि.१३.०२.२०२३ रोजीचे पत्र अपिलार्थीस, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावे, या निष्कर्षाप्रत येऊन अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र.- 9391 दिनांक : 07/08/2025
प्रत :- आवश्यक कार्यवाहीकरिता,
जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता श्रेणी-२, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, नायगाव, जि.नांदेड

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक - ३३२२/२०२३
बोर्ड क्र.८८

श्रीमती गोदावरी गोरखनाथ कदम, — अपिलार्थी
रा.सोन्ना, ता.पूर्णा, जि.परभणी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
अधीक्षक,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
सहायक अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड

**(सुनावणी दिनांक १५.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१२.०५.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १०.०२.२०२२ | १. प्रजिमा-१२ ची रुंदी, २. प्रजिमा-१२ ची रुंदी सोन्ना गावाच्या हद्दीत किती आहे, ३. प्रजिमा-१२ ची रुंदी पिंपळगाव (लिखा) गावाच्या हद्दीत किती आहे, ४. प्रजिमा-१२ सोन्ना गावातील कोणकोणत्या भूमापन क्रमांकातुन गेलेला आहे, ५. प्रजिमा-१२ शासकीय जागेतुन नेण्यात आला आहे का, ६. अ.क्र.५ चे उत्तर नाही असल्यास प्रजिमा-१२ साठी सोन्ना गावातील भूसंपादनाची साक्षांकित प्रत द्यावी, |

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणीकरिता कोणीही उपस्थित नाहीत. त्यामुळे अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उपलब्ध करुन दिली किंवा कसे याचा कोणताही बोध आयोगापुढील कागदपत्रावरुन होत नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांनी, अपिलार्थी यांच्या

जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. सहायक अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 9392 दिनांक : 07/08/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक - ३९६८/२०२३**
**बोर्ड क्र.८९**

श्री.रणजीत जळबाजी गवळे,
रा.डॉ.आंबेडकर नगर, नांदेड — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
प्रथम लिपिक,
सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर, जि.नांदेड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर, जि.नांदेड — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक १५.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२२.०१.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा प्रथम लिपिक, श्री.ओमप्रकाश घेवारे व प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, श्री.सुरज गट्टूवार उपस्थित उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ११.०१.२०२३ | सन २०२१-२०२२, २०२२-२०२३ या कालावधीत उपविभागनिहाय (सा.बां.) देण्यात आलेल्या कार्यारंभ आदेशाच्या योजनानिहाय छायांकित प्रती. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अत्यंत विस्तृत स्वरुपाची असुन अपिलार्थी यांनी मोघमपणे कार्यालयाच्या अधिनस्त आठ उपविभागाशी संबंधित माहितीची मागणी केलेली आहे. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास दि.२४.०१.२०२३ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन माहितीचे अवलोकन करणेबाबत अपिलार्थी यांना सुचित केलेले आहे. तथापि अपिलार्थी यांनी अवलोकनास्तव प्रतिसाद दिलेला नाही. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१३.०३.२०२३ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी अपिलार्थी यांचे प्रथम अपील अंशतः मंजूर करुन माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेशित केलेले आहे. सदर प्रथम अपिलाच्या निर्णयास अनुसरुन दि.१४.०६.२०२३ रोजीच्या पत्रान्वये, माहितीचे अवलोकन करुन माहिती प्राप्त करुन घेण्याबाबत अपिलार्थी यांना पुनःश्च सुचित करण्यात आलेले आहे. तथापि अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिलेला नाही. या परिस्थितीत अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे. या निर्णयाव्दारे माहिती उपलब्ध करुन देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे. अशा स्वरुपातील माहिती एकत्रित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते, ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाहीत.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 9393 दिनांक : 07/08/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक - ४९४५/२०२३
बोर्ड क्र.९०

श्री.पांडुरंग पि.संभाजी बुक्तरे, — अपिलार्थी
रा.घर नंबर १-१०-१६८, प्रभात नगर, जंगमवाडी रोड, नागसेन शाळेजवळ, नांदेड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
शाखा अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, उत्तर नांदेड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उपअभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, उत्तर नांदेड

(सुनावणी दिनांक १५.०७.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.०७.०८.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २४.०५.२०२३ | मौजे वाडी बु. येथील १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालयासंबंधित कंत्राटाचे संपूर्ण नस्ती उपलब्ध करुन देणेबाबत. |

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणीकरिता कोणीही उपस्थित नाहीत. त्यामुळे अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उपलब्ध करुन दिली किंवा कसे याचा कोणताही बोध आयोगापुढील कागदपत्रावरुन होत नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नसल्याने / माहिती देण्यास जाणीवपूर्वक टाळाटाळ, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, उत्तर नांदेड यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित

करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, उत्तर नांदेड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 9394 दिनांक : 07/08/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक - ५८७८/२०२३
बोर्ड क्र.९१

श्री.अशोक बाबाराव कदम,
रा.मंगलसांगवी, ता.कंधार, जि.नांदेड — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
प्रथम लिपिक,
सार्वजनिक बांधकाम विभाग, स्नेहनगर, नांदेड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपकार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, स्नेहनगर, नांदेड — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक १५.०७.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.०८.०९.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा प्रथम लिपिक, श्री.के.व्ही.वावरे व प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, श्री.ओ.जी.काळे, उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १६.०५.२०२३ | आपले कार्यालयाअंतर्गत लोहा तालुक्यातील धानोरा चिंतळी ते देऊळगाव मस्की या रस्त्याचे कामाचे अंदाजपत्रक, मंजुरी आदेश, काम सुरु आदेश, मोजमाप पुस्तिका, चेकबुक, बँक व्हावचर याच्या छायांकित तथा साक्षांकित प्रती तसेच सदरील रस्त्याचे काम पूर्णत्वाचा कालावधी किती आहे याची माहिती, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिली किंवा कसे याचा कोणताही बोध उपलब्ध संचिकेवरुन होत नाही. तथापि अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने कार्यवाही करण्यात येईल.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.०४.०९.२०२३ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे पंधरा दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात ओले आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी उपलब्ध करुन देतील ही बाब प्रथम अपिलीय अधिकारी या नात्याने व्यक्तिश: पाहण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न दिल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा प्रथम लिपिक, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 9395 दिनांक : 07/08/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक - ६१७६/२०२३**
**बोर्ड क्र.९२**

श्री.पठाण जोहरखान मोहेद्दीन, अपिलार्थी
रा.मुगट, ता.मुदखेड, जि.नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी क्र.१
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, मुदखेड, जि.नांदेड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
उपविभागीय अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, मुदखेड, जि.नांदेड

**(सुनावणी दिनांक १५.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०७.०८.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २५.०९.२०२३ | मुगट शेत गट क्र.१०७ लगत पुलाचे बांधकाम PWD अंतर्गत होत असुन सदरील बांधकाम करण्यापूर्वी शेजारील शेतकऱ्यांना नोटीस दिल्याच्या सत्यप्रती देऊन पुलाचे अंदाजपत्रकच्या सत्यप्रती देणे, तसेच काम सुरु करण्याच्या आदेश प्रत देणे, काम पूर्ण झाल्यावर कामाचा दोषदायित्व कालावाधी किती, लेखी अहवाल देणेबाबत. |

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणीकरिता कोणीही उपस्थित नाहीत. त्यामुळे अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उपलब्ध करुन दिली किंवा कसे याचा कोणताही बोध आयोगापुढील कागदपत्रावरुन होत नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, मुदखेड, जि.नांदेड यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन

अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, मुदखेड, जि.नांदेड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 9396 दिनांक : 07/08/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक - ६३७०/२०२३
बोर्ड क्र.९३

सौ.शकुंतला शामसुंदर देशपांडे,
रा.एस अँड बी, हनुमान मंदिरासमोर, आनंदनगर, वसमत रोड, परभणी — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी, तथा
अधीक्षक,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
सहायक अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक १५.०७.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.०३.१०.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २४.०४.२०२३ | माझे मा.अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम मंडळ नांदेड यांना दि.२४.११.२०२२, कृपया मी मा.अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ नांदेड यांना उक्त विषयात सविस्तर पत्र दि.२४.११.२०२२ निर्गमित करुन विषयात नमूद केलेल्या बाबतीत सकारात्मक कार्यवाही करण्याची विनंती केली आहे, सदर पत्राची प्रत सह त्यावर अद्ययावत केलेल्या कार्यवाहीची माहिती, |

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणीकरिता कोणीही उपस्थित नाहीत. त्यामुळे अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उपलब्ध करुन दिली किंवा कसे याचा कोणताही बोध आयोगापुढील कागदपत्रावरुन होत नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता,

अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना अधिनियमातील कलम २ (J) मधील तरतुदीनुसार अवलोकनास्तव उपलब्ध करुन देणे संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. सहायक अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 9397 दिनांक : 07/08/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक - ७२७८ व ७२७९/२०२३ (०२)**
**बोर्ड क्र.९४ व ९५**

श्री.सोमेश मारोतीराव कलेटवाड, — अपिलार्थी
रा.नाटकर गल्ली, व्यंकटेश पुज्जलवार यांचा वाडा, देगलूर,
ता.देगलूर, जि.नांदेड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी, तथा — : उत्तरवादी क्र.१
उपकार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, देगलूर, जि.नांदेड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, देगलूर, जि.नांदेड

**(सुनावणी दिनांक १५.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०९.११.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, श्री.व्ही.डी.गाडेकर उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दोन जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ९४ | ०३.०५.२०२३ | जुन्या बसस्टँड जवळील पोलीस वसाहतीच्या पुर्वेस रोड लगत लावणेत आलेले तारेचे कंपन व तारेची जाळी व वसाहतीची पाटी लावणेत आली त्याबाबत आलेला खर्चाचे देयकाची छायांकित सत्यप्रत व गुत्तेदाराचे नाव व सदर जागा कोणाची आहे याबाबतची माहिती, |
| ९५ | ०३.०५.२०२३ | जुन्या बसस्टँड जवळील पोलीस वसाहत देगलूर येथील वसाहतीच्या पुर्वेस सेफ्टी टँक बांधण्यात आली आहे त्याचे बील अदा देयकाची छायांकित सत्यप्रत व धनादेशाची सत्यप्रत व गुत्तेदाराचे नाव मिळणेबाबत, सन २००७ ते २००८, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.०७.०८.२०२३ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन, तारेचे कुंपन, तारेची जाळी व वसाहतीची

पाटी ही कामे कार्यालयाकडुन करण्यात आली नसल्याचे, तसेच सेप्टीक टँक बाबतची माहिती सन २००७-२००८ या कालावधीतील असुन सार्वजनिक बांधकाम विभाग, देगलूर हे कार्यालय दि.०२.११.२०१५ रोजी नव्याने स्थापित झाल्यामुळे सन २०१५ पूर्वीची माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्याचे अपिलार्थी यांना कळविण्यात आलेले आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.१४.०८.२०२३ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे १५ दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती देणेबाबत आदेश पारित करुनही माहिती न दिल्याबाबत, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि.०७.०८.२०२३ रोजीच्या पत्रान्वये माहिती / वस्तुस्थिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे. तथापि सदर पत्राची प्रत अपिलार्थीस प्राप्त झाली नसल्याचे अपिलार्थी यांच्या व्दितीय अपिलातील प्रयोजनावरुन दिसुन येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, देगलूर, जि.नांदेड यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र-अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती / वस्तुस्थिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, देगलूर, जि.नांदेड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह दोन व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(सही) ५।२।१६

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 9398 दिनांक : 07/08/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक - ८३७८ व ८३७९/२०२३ (०२)
बोर्ड क्र.९६ व ९७

श्री.मिदे गंगाराम,
रा.शिवशक्ती नगर, मिल रोड, नांदेड — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी, तथा
प्रथम लिपिक,
सार्वजनिक बांधकाम विभाग, स्नेहनगर, नांदेड — उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपकार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, स्नेहनगर, नांदेड — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक १५.०७.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.२९.१२.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा प्रथम लिपिक, श्री.के.व्ही.वावरे व प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, श्री.ओ.जी.काळे उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दोन जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ९६ | २३.०६.२०२३ | कार्यालयात असलेले कर्मचारी व अधिकारी दिव्यांग, धरणग्रस्त, प्रकल्प ग्रस्त, भुकंप ग्रस्त, पुरग्रस्त, स्वातंत्र सैनिक या प्रमाणपत्रावर नियुक्ती व पदोन्नती झालेले कर्मचारी व अधिकारी पदनिहाय माहिती मिळणे, |
| ९७ | ०३.०५.२०२३ | कार्यालयात असलेले कर्मचारी व अधिकारी यांनी अनुसुचित जमाती या प्रमाणपत्र मन्नेरवारलू, कोळी महादेव, राजपुत भामटा या जातीवर नोकरी करीत असलेले कर्मचारी यांची बाबसहीत व पदनिहाय माहिती मिळणे, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिली किंवा कसे याचा कोणताही बोध उपलब्ध संचिकेवरुन होत नाही. तथापि अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने आयोगाने

निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने कार्यवाही करण्यात येईल.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२०.०९.२०२३ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे १५ दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात आलेले आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी उपलब्ध करुन देतील ही बाब प्रथम अपिलीय अधिकारी या नात्याने व्यक्तिश: पाहण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देण्यास टाळाटाळ, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन १५ दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. सदर प्रथम अपील निर्णयाची अंमलबजावणी झालेली नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा प्रथम लिपिक, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती / वस्तुस्थिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह दोन व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 9422 दिनांक : 07/08/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक - ७३१८/२०२३
बोर्ड क्र.९८

श्री.तुकाराम संतोबा पवार,
रा.वाहेगाव, ता.जि.नांदेड — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी, तथा
प्रथम लिपिक,
सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड — उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपकार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक १५.०७.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.१३.११.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा प्रथम लिपिक, श्री.के.व्ही.वावरे व प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, श्री.ओ.जी.काळे उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २५.०८.२०२३ | १.मोहनपुरा मौजे वाहेगाव ते सोमेश्वर जैतापूर गोदावरी नदीवरील होत असलेल्या पुलाच्या कामाचे अंदाजपत्रक, मोजमाप पुस्तिका व कामाच्या आदेशाची प्रत व गुण नियंत्रण विभागाने पुलाच्या कामाचे किती वेळेस तपासणी केली त्या तपासणीचे रिपोर्ट देणे,<br>२.पुलाच्या दोन्ही साईटने होत असलेल्या जोड रस्त्याच्या कामाचे अंदाजपत्रक, मोजमाप पुस्तिका व कामाच्या आदेशाची प्रत देणे, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती सार्वजनिक बांधकाम उपविभाग, दक्षिण नांदेड या कार्यालयाशी संबंधित असल्यामुळे अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज दि.०८.०९.२०२३ रोजीच्या पत्रान्वये, जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग दक्षिण नांदेड यांच्याकडे कलम ६ (३) नुसार वर्ग करण्यात आलेला आहे. तथापि संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिली किंवा कसे ही बाब ज्ञात होऊ शकलेली नाही.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली माहिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी उपलब्ध करुन देतील, ही बाब प्रथम अपिलीय अधिकारी या नात्याने व्यक्तिश: पाहण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर केलेल्या युक्तिवादावरुन अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती दुसऱ्या कार्यालयाशी संबंधित असल्याचे दिसुन येत आहे. अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती दुसऱ्या कार्यालयाशी संबंधित असल्यास अशा माहितीकरिता अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज अधिनियमातील कलम ६ (३) नुसार माहितीशी संबंधित कार्यालयाकडे / प्राधिकरणाकडे जास्तीत जास्त पाच दिवसात हस्तांतरित करणे आवश्यक आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांच्या दि.२५.०८.२०२३ रोजीच्या माहिती अर्जाचे हस्तांतरण कलम ६ (३) नुसार विहित केलेल्या मुदतीनंतर झाले असल्याचे निदर्शनास येत आहे. या परिस्थितीत अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती माहितीशी संबधित कार्यालयाकडुन आता जन माहिती अधिकारी यांना कलम ५ (४) मधील तरतुदीनुसार एकत्रित / संकलित करुन अपिलार्थीस द्यावी लागेल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा प्रथम लिपिक, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली माहिती ज्या कार्यालयाकडे / प्राधिकरणाकडे उपलब्ध आहे ती कार्यालयाकडुन / प्राधिकरणाकडुन (सार्वजनिक बांधकाम उपविभाग, दक्षिण नांदेड) अधिनियमातील कलम ५ (४) मधील तरतुदीनुसार एकत्रित / संकलित करुन अशी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 9421 दिनांक : 07/08/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक - १०७२७/२०२१**
**बोर्ड क्र.९९**

श्री.रमेश गोरसिंग पवार,
रा.भिलडोंगर, पो.शेंदुरजना (अ), ता.मानोरा, जि.वाशिम — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
प्रथम लिपिक,
सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर, जि.नांदेड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर, जि.नांदेड — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक १५.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२८.१०.२०२१ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा प्रथम लिपिक, श्री.ओमप्रकाश घेवारे व प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, श्री.सुरज गड्डुवार उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १९.०७.२०२१ | दि.१९.०४.२०१७ ते दि.३०.०६.२०२१ पर्यंत,<br>१. वरील कालावधीतील आपल्या सर्व बांधकामाची माहिती, त्याचे मराठीत अंदाजपत्रक,<br>२. या सर्व कामाची निविदा व जाहिरातीची पूर्ण माहिती,<br>३. रोजगार हमी योजना व इतर सर्व कामात घेतलेल्या मजुरांची पगारपत्रकासह माहिती,<br>४. या सर्व कामाची शासनाची व प्रशासनाची आर्थिक मान्यतेची / ठरावाची माहिती,<br>५. ठेकेदारांना दिलेल्या कामाची व या ठेकेदारांनी भरलेल्या आयकर, रॉयल्टीची पावती / चालानसह माहिती,<br>६. ठेकेदारांनी मुदतीत काम केले किंवा मुदत संपल्यानंतर किती मुदत दिली या मुदत वाढीची पूर्ण माहिती,<br>७. या सर्व कामांची कर्मचारी, अधिकारी यांनी पाहणी / चौकशी केलेल्या अहवालाची माहिती,<br>८. आपल्या कर्मचारी व अधिकारी यांनी बेकायदेशीर गौण खनिज प्रकरणात वसुल केलेली रक्कम व दंडाची माहिती, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती

अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिली किंवा कसे याचा कोणताही बोध उपलब्ध संचिकेवरुन होत नाही. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती मोघम व विस्तृत स्वरुपाची आहे. याबाबत आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने कार्यवाही करण्यात येईल.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी कार्यवाही करतील ही बाब प्रथम अपिलीय अधिकारी या नात्याने व्यक्तिश: पाहण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळालेली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती विस्तृत व मोघम स्वरुपाची असुन कालावधी मोठा आहे. अशी माहिती एकत्रित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते, ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाहीत. या प्रकरणाच्या अनुषंगाने मा.सर्वोच्च न्यायालयाने सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशन व इतर विरुध्द आदित्य बंडोपाध्याय व इतर सिव्हिल अपील नं.६४५४/२०११ या प्रकरणात दि.०९.०८.२०११ रोजी पारित केलेल्या निर्णयाकडे सर्व संबंधितांचे लक्ष वेधण्यात येत आहे. या निर्णयामध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने माहिती अधिकाराचा योग्य वापर होणेबाबत लक्ष वेधलेले आहे. याचाही सर्वांनी विचार करणे आवश्यक आहे, असे आयोगाचे मत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 9419 दिनांक :- 07/08/2025

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक - ६८५०/२०२३
बोर्ड क्र.१००

श्री.मोहम्मद अब्दुल मुख्तार,
संपादक दैनिक गोदावरी ऑब्झर्वर, वजीराबाद, नांदेड — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
व्यवस्थापक,
जिल्हा उद्योग केंद्र, उद्योग भवन, शिवाजीनगर, नांदेड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
महाव्यवस्थापक,
जिल्हा उद्योग केंद्र, उद्योग भवन, शिवाजीनगर, नांदेड — उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक १५.०७.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.१९.१०.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०२.०६.२०२३ | १. मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (CMEGP) या योजने अंतर्गत सन २०२२-२३ या आर्थिक वर्षामध्ये नांदेड व परभणी जिल्ह्यातील प्रशिक्षण झालेल्या लाभार्थ्यांची नावे व मोबाईल नंबर व पत्ता देण्यात यावे, तसेच या प्रशिक्षणासाठी प्रति लाभार्थी शासनाची किती खर्चाची तरतुद आहे ते देण्यात यावे,<br>२. तसेच या आर्थिक वर्षामध्ये २०२२-२३ मध्ये झालेल्या प्रशिक्षणाची खर्चाची बिले उदाहरणार्थ जेवणाचे, राहण्याचे व इतर खर्च Bill Invoice देण्यात यावे, तसेच राहण्याची व जेवणाची व्यवस्था कुठे केली होती त्याचा पत्ता देण्यात यावा,<br>३. प्रशिक्षण देणाऱ्यांची नावे, पत्ता व मोबाईल देण्यात यावे, |

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणीकरिता कोणीही उपस्थित नाहीत. त्यामुळे अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उपलब्ध करुन दिली किंवा कसे याचा कोणताही बोध आयोगापुढील कागदपत्रावरुन होत नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, विचारलेल्या माहितीचे आणि दिलेल्या माहितीचे कुठेच ताळमेळ लागत नाही / माहिती लपवण्याचा किंवा दिशाभूल करण्याचा प्रयत्न करत आहेत, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती

अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहिती स्वरुप व अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना नमूद केलेले प्रयोजन विचारात घेता, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना अधिनियमातील कलम २ (J) मधील तरतुदीनुसार अवलोकनास्तव उपलब्ध करुन देणे संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, उद्योग भवन, नांदेड यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, उद्योग भवन, नांदेड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्रइ

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 9420 दिनांक : 07/08/2025